cmyk

## संपादकीय

### कोलकाता हत्याकांडावर न्यायालयाची फटकार

अनेक स्वप्ने घेऊन महिला वैद्यकीय क्षेत्रात येतात. पण सरकारी रुग्णालयातील राक्षस नराधम त्यांना त्यांचे इप्सित साध्य करू देत नाहीत, याचे दर्दनाक उदाहरण म्हणजे कोलकत्यातील आर. जी. मेडिकल रुग्णालयातील वैद्यकीय प्रशिक्षणार्थी डॉक्टरची झालेली हत्या आणि त्यापूर्वी तिच्यावर झालेला बलात्कार. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने स्वतः दखल घेत मंगळवारी पश्चिम बंगाल सरकारला चांगलेच खडसावले. यामुळे महिला डॉक्टरशी केलेल्या दुष्कर्मानंतर बंगाल सरकार बॅकफूटवर आल्याचे पाहायला मिळत आहे.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### तुमची शिकवण हीच माझी प्रेरणा; राहुल यांची राजीव गांधींना आदरांजली

नवी दिल्ली: भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची मंगळवारी (दि.२० ऑगस्ट) जयंती होती. या निमित्त लोकसभेचे विरोधी पक्षनेते काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांनी वडील राजीव गांधी यांना आदरांजली वाहिली. त्यांनी एक्स पोस्टवरून वडीलांविषयींच्या भावना व्यक्त केल्या आहे. त्यांनी म्हटले आहे की, ''एक दयाळू व्यक्तिमत्व, सुसंवाद आणि सद्भावनेचे प्रतीक बाबा. तुमची शिकवण हीच माझी प्रेरणा आहे आणि तुमच्या आठवणी माझ्यासोबत घेऊन मी भारतासाठी तुमची स्वप्ने पूर्ण करेन. काँग्रेस नेते सचिन पायलट यांनी देखील माजी पंतप्रधान राजीव गांधी यांना त्यांच्या जयंतीनिमित्त वीर भूमी येथे पुष्पांजली वाहिली.

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१२० | बुधवार दि.२१ ऑगस्ट २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

# नाफेडच्या कांदा खरेदीत भ्रष्टाचार

## कांदा उत्पादक शेतकऱ्यांची यादी समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्याने संताप

**नाशिक। प्रतिनिधी**

**कांदा उत्पादकांचा असंतोष कमी करण्यासाठी नाफेडमार्फत कांदा खरेदी करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. मात्र या खरेदीत मोठा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप कांदा उत्पादक शेतकरी वारंवार करत आहेत. आता मात्र समाजमाध्यमावर एका व्हायरल झालेल्या यादीवरून नाफेडविरोधात कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे.**

नाफेडने केंद्र सरकारच्या आदेशाप्रमाणे नाशिक जिल्ह्यातील सहा हजार चारशे पंधरा शेतकऱ्यांकडून कांदा खरेदी केल्याचा दावा करण्यात आला होता. यात कांदा खरेदीमध्ये तफावत समोर आली आहे. तसेच १८ ते २२ मे दरम्यान कांदा खरेदीचे रकाने आणि तपशील रिक्त दिसत आहे. त्यावरून कांदा उत्पादक शेतकऱ्यांकडून नाफेडमध्ये भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करण्यात आला. मात्र नाफेड प्रशासनाने आपली बाजू मांडताना समाज माध्यमांवर व्हायरल झालेली शेतकऱ्यांची यादी अधिकृत नसल्याचे म्हटले आहे. दरम्यान, चांदवड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजय जाधव यांनी देखील यावरून नाफेडच्या कारभारावर टीका केली आहे. जाधव यांनी सध्या नाफेडने नेमलेल्या कंपन्या कांदा खरेदी परस्परपद्धतीने करत आहे. तर कांदा खरेदी बाजारातून कमी किंमतीत उचलून



चांगल्या दराने शेतकऱ्यांच्या नावे घेत आहेत. हा काळाबाजार सुरू असून सरकारने नेमलेल्या एजन्सींनी तो थांबवावा. कृषी उत्पन्न बाजार समितीत येऊन व्यापाऱ्यांप्रमाणे कांदा खरेदी करावा, असे केले तरच चार पैसे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मिळतील. तर नाफेडने थेट कांदा उत्पादकांचा कांदा खरेदी केला असेही शेतकरी म्हणतील. पण नाफेडमध्ये पान २ वर

### सुविधा नसताना दहा एजन्सीला खरेदीचे अधिकार दिले कसे ?

नाशिकमधील कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी भारतीय राष्ट्रीय कृषी, सहकार व विपणन महासंघाच्या (नाफेड) २१ संचालक मंडळासह दहा कांदा खरेदीची शेतकरी उत्पादक कंपन्यांवर भारतीय जनता पार्टीच्या स्थानिक नेत्यांशी संबंधित आहे. त्याच्या हितसंबंधातून नाफेडमध्ये भ्रष्टाचार झाल्याचा संशय व्यक्त केला आहे. तर राज्यात नेमलेल्या १० एजन्सीजकडे कांदा खरेदीसाठी कोणतीही विशेष सुविधा उपलब्ध नाही. मग त्यांना कांदा खरेदीचे अधिकार कसे देण्यात आले? असा सवाल शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे.

### अधिकाऱ्यांसह सगळेच संशयाच्या भोवऱ्यात

ज्या शेतकऱ्यांच्या बँक खात्यात पैसे वर्ग झालेत त्यांच्यासह कांदा खरेदी स्थानिक व्यापारी, नाफेडचे स्थानिक आणि दिल्लीतील अधिकारी सर्वच संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. तर यापूर्वी देखील घोटाळा झाल्याने निफाडच्या दोन अधिकाऱ्यांची तडकाफडकी बदली करण्यात आली होती.

# चिमुकल्यांवर अत्याचार: रेल्वे आडवल्या, पोलिसांचा लाठीचार्ज

**मुंबई । प्रतिनिधी**

बदलापूरमध्ये एका शाळेत दोन चिमुकल्यावर एका नराधमाने अत्याचार केल्याची घटना उघड झाल्यावर नागरिकांनी रेल्वे आडवत आक्रमक भुमिका घेतली त्यामुळे पोलिसांना लाठीचार्ज करावा लागला. या घटनेची दखल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतली असून अशा घटना घडल्यास प्रसंगी संस्थाचालकांवर देखील कारवाई



करण्यात येईल, असा इशारा दिला. आरोपीला कडक शासन करण्यात येईल, यासाठी जलदगती न्यायालयात (फास्ट ट्रॅक) तातडीने खटला चालविण्याचे निर्देशही त्यांनी

## बदलापूर घटनेचा खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात

दिले. यासंदर्भात मुख्यमंत्री शिंदे यांनी पोलीस आयुक्तांशी देखील चर्चा केली. तसेच शाळांमध्ये 'सखी सावित्री समित्या' स्थापन झाल्या आहेत किंवा नाही ते तपासण्याचे निर्देशही मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी दिले. बदलापूर पूर्वमधील एका नामांकित शाळेत दोन मुलींवर झालेल्या अत्याचाराची पान २ वर

**पोलिसांचा लाठीचार्ज, दहा तासांनी रेल्वे मार्ग मोकळा**

या घटनेच्या निषेधार्थ आरोपींना फशीची शिक्षा व्हावी अशी मागणी करत नागरिकांनी बदलापूर रेल्वे स्थानकावर ठिय्या आंदोलन केले दहा तास रेल्वे विभागाला याचा फटका बसला. पोलिसांसह स्थानिक आमदार आणि मंत्री गिरीश महाजन यांनीही आंदोलन मागे घेण्याचे आवाहन केले होते, मात्र आंदोलक मागे हटले नाहीत अखेर पोलिसांना सौम्य लाठीचार्ज करावा लागला. यावेळी आंदोलकांनी पोलिसांवर दगडफेक केली याला पोलिसांनीही दगडफेक करत प्रत्तुत्तर दिले आणि बदलापूर रेल्वे स्थानक मोकळे केले.

## बोंडअळी व अन्य किडींचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कृषी विभाग ॲक्शन मोडवर

### तातडीने उपाययोजना राबवा–कृषीमंत्री मुंडे




**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यात बऱ्याच ठिकाणी खरीप पिकांवर व विशेष करून सोयाबीन व कापसावर बोंड आळी व अन्य किडींचा प्रादुर्भाव असल्याच्या काही घटना उघड झाल्या असून याबाबत कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात कृषी विभाग ॲक्शन मोडवर आला आहे.**

कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी याबाबत मंगळवारी तातडीने विभागाची बैठक घेत डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला यांच्यामार्फत तयार करण्यात आलेले सोलार लाईट ट्रॅप बाधित शेतकऱ्यांना तातडीने उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत. हे लाईट ट्रॅप बोंड आळीचे व अन्य किडींचा प्रादुर्भाव रोखण्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरले आहेत. तसेच फेरामाईन ट्रॅप व कृषी विद्यापीठाने सुचवलेल्या वेगवेगळ्या फवारण्या आदी बाबत शेतकऱ्यांना जागृती व उपलब्धता करून देण्याचे निर्देश दिले. याबाबत आयुक्त स्तरावरून व कृषी विद्यापीठाचे तज्ञ यांची एक संयुक्त टीम करून दैनंदिन आढावा घेण्याचे तसेच पान २ वर

# पेपरच्या बातम्या तथ्यहीन असतात, त्यामुळे मी पेपर वाचत नाही !

## आ.प्रकाश सोळंके यांचे संतापजनक वक्तव्य



**दिंद्रुड । प्रतिनिधी**

आमदारकीचा पंचवार्षिक कार्यकाल संपत आल्यानंतर आमदार प्रकाश सोळंके यांना मतदारांशी संवाद साधण्याची आठवण आली आहे. याच संवाद यात्रेत दिंद्रुड येथे सोळंके यांनी, ''पेपरच्या बातम्या मी वाचत नाही, पेपरच्या बातम्या वाचनं मी सोडून दिलय. कारण त्यात काही तथ्य नसतं. काय लिहितात आणि काय नाही? असे आश्चर्यकारक वक्तव्य करून पत्रकार व पत्रकारिता यांच्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण केल्याने संताप व्यक्त होत आहे. शेकडो पान २ वर

# रस्त्यांसाठी ६१ कोटींचा निधी

## माजी मंत्री सुरेश धस यांचा पाठपुरावा

**आष्टी । प्रतिनिधी**

**माजीमंत्री सुरेश धस यांनी आष्टी विधानसभा मतदारसंघातील वाड्या वस्त्यांवर दर्जेदार सिमेंट रस्ते व्हावेत.यासाठी सतत विशेष प्रयत्न केले आहेत. त्यांच्या या सततच्या पाठपुराव्यामुळे. आष्टी विधानसभा मतदार संघ क्षेत्रात मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा –२ संशोधन व विकास अंतर्गत सिमेंट रस्ता बांधकाम करण्यास**



**६१ कोटी १४ लक्ष रु.किमतीच्या सिमेंट रस्त्यांच्या कामांना मंजुरी मिळाली असून निधी उपलब्ध असल्यामुळे लवकरच या कामांना सुरुवात होणार आहे.**

महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री,एकनाथ शिंदे साहेब,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजित पवार, ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन यांचे माजी मंत्री सुरेश धस यांनी पान २ वर

### विठ्ठल मंदिरात दर्शनाचा काळाबाजार

सोलापूर : लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात दर्शनाचा काळाबाजार सुरू असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. भाविकांकडून पैसे घेऊन विठ्ठलाचे व्हीआयपी पदस्पर्श दर्शन घडवून पोलीस पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१३ ऑगस्ट २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ७.०० क्विंटल | २,३०० | २,६३५ | २,४६८ |
| ज्वारी/हायब्रिड :५९.५० क्विंटल | २,१३१ | २,६०१ | २,३२० |
| मूग :१.५० क्विंटल | ७,७०० | ७,७०० | ७,७०० |
| तूर : २.०० क्विंटल | ७,७०१ | ७,७०१ | ७,७०१ |
| उडीद : २.५० क्विंटल | ४,९०१ | ७,४०० | ६,१५० |
| बाजरी: २८.०० क्विंटल | २,४७१ | ३,३९० | २,७५० |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: ३१.०० क्विंटल | ४,२०० | ४,२०० | ४,२०० |
| हरभरा: ८.०० क्विंटल | ६,५८० | ६,५८० | ६,५८० |






cmyk

cmyk



## अग्रलेख

# कोलकाता हत्याकांडावर न्यायालयाची फटकार

अनेक स्वप्ने घेऊन महिला वैद्यकीय क्षेत्रात येतात. पण सरकारी रुग्णालयातील राक्षस नराधम त्यांना त्यांचे इप्सित साध्य करू देत नाहीत, याचे दर्दनाक उदाहरण म्हणजे कोलकत्यातील आर. जी. मेडिकल रुग्णालयातील वैद्यकीय प्रशिक्षणार्थी डॉक्टरची झालेली हत्या आणि त्यापूर्वी तिच्यावर झालेला बलात्कार. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने स्वतः दखल घेत मंगळवारी पश्चिम बंगाल सरकारला चांगलेच खडसावले. यामुळे महिला डॉक्टरशी केलेल्या दुष्कर्मानंतर बंगाल सरकार बॅकफूटवर आल्याचे पाहायला मिळत आहे. या प्रकरणाची सुनावणी करणारे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड म्हणाले की, सकाळी गुन्हा उघडकीस आल्यानंतर ही आत्महत्या भासवण्याचा प्रयत्न केला आणि पीडितेच्या पालकांना मृतदेह देखील पाहू दिला नाही. तसेच घटना उजेडात आल्यानंतर रात्री उशिरापर्यंत एफआयआर नोंदवण्यात आला नव्हता. याप्रकरणी एफआयआर नोंदवण्यास झालेला उशीर आणि घटनास्थळी नासधूस केल्याबद्दल न्यायालयाने राज्य सरकारला खडसावले आहे.

कोलकत्यातील घटनेच्या निषेधार्थ देशव्यापी निदर्शने केली जात आहेत. बंगाल सरकारने काही दिशानिर्देशही जारी केले आहेत. पण त्याला आता फार उशीर झाला आहे. आता महिलांच्या सुरक्षेबाबतीत मोबाईल लॉँचिंगची तयारी केली. पण अपराध घडून गेल्यानंतर या उपायांचा काहीही उपयोग नसतो. मृत डॉक्टरच्या आईने सांगितले की, जेव्हा आम्ही रुग्णालयात तिला भेटण्यासाठी गेलो तेव्हा तिच्या अंगावर एक कपडाही नव्हता. रुग्णालयाच्या व्यवस्थापनाने अगोदर सांगितले की, मृत डॉक्टरने आत्महत्या केली. पण नंतर तिची हत्या झाल्याचे निष्पन्न झाले. एकूणच या प्रकरणात बंगाल सरकारचा आणि तेथील अधिकाऱ्यांची मिलिभगत आहे या संशयाला जागा आहे. कोलकता उच्च न्यायालयाने या प्रकरणाची आपण होऊन दखल घेतल्याने या प्रकरणाला वाचा फुटली. पण हे प्रकरण राज्य सरकारने न्यायालयात न्यायला हवे होते. देशाच्या अनेक भागांत यामुळे आरोग्य सेवा कोलमडली आहे. मृत डॉक्टरच्या शरीरावर अनेक जखमा होत्या. कोलकत्याच्या माजी प्रिन्सिपल डॉ. संदीप घोष यांनी या प्रकरणात आरोप केला आहे की, बलात्कार प्रकरणात राजीनामा दिल्यानंतर लगेचच येथील मुख्य डॉक्टरांना कसे अन्य एका सरकारी रुग्णालयाच्या प्रमुख पदी नेमले जाते. या प्रकरणातील मुख्य आरोपी डॉ. रॉय यांना लगेचच एका सरकारी रुग्णालयाच्या मुख्य डॉक्टरपदी कसे नेमले जाते हा सवाल अनेकांनी उपस्थित केला आहे. डॉ. रॉय यांचे माजी सहकारी आणि बॅचमेट यांनी तर आरोप केला आहे की, माफियासारखी शस्त्रक्रिया करण्यात आली. डॉ. रॉय यांचा प्रवास बोंगाईसारख्या गावातून सुरू झाला आणि त्यांनी आर. जी. मेडिकल कॉलेजमधूनच वैद्यकीय पदवी प्राप्त केली होती. एका त्यांच्या सहकारी डॉक्टरने सांगितले की, डॉ. रॉय हे आपल्या वैद्यकीय जीवनात कधीही हुशार नव्हते तरीही त्यांना इतकी मोठी जबाबदारी सोपवण्यात आली. ते १६ व्या स्थानावर असतानाही त्यांनी वैद्यकीय महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून स्थान ग्रहण केले. डॉ. रॉय यांनी ही छलांग कशी मारली हे अजूनही रहस्यमयी आहे. इतकेच नव्हे तर डॉ. रॉय यांच्यावर भ्रष्टाचार प्रकरणाचे आरोप झाले होते. याहीपेक्षा डॉ. रॉय यांच्यावर शवविच्छेदनासाठी ठेवण्यात आलेली प्रेते पुन्हा अनधिकृत उपयोगासाठी वापरण्याचा आरोपही करण्यात आला आहे.

कोलकत्यातील डॉक्टरच्या हत्या आणि बलात्कार प्रकरणी देशभरातील डॉक्टर्स संपावर गेले आहेत आणि त्यांना या प्रकरणी दोष देऊन चालणार नाही. अनेक ठिकाणी मेणबत्ती मोर्चा, काही ठिकाणी डॉक्टरांचे आंदोलन सुरू आहे. पश्चिम बंगालचे सरकार ममता बॅनर्जी यांचे आहे. राज्याचे सरकार आपल्या डॉक्टरांना पुरेशी सुरक्षितता देऊ शकत नाही हे वास्तव यानिमित्ताने समोर आले आहे. पण वास्तव हे आहे की पश्चिम बंगालमध्ये न्यायालयीन व्यवस्थाच नव्हे तर साऱ्याच राजकीय लज्जास्पदतेने आपल्या सीमा ओलांडल्या आहेत. महिला कर्मचाऱ्यांप्रती पश्चिम बंगाल सरकारची वाढती अनास्थाही याचे मूळ आहे. प.बंगाल सरकार कोणत्याही विरोधी टीकेची पर्वा करत नाही हे वास्तव आहे आणि त्याचाच परिपाक म्हणजे या प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर झालेला बलात्कार आणि त्यानंतर झालेल्या अनन्वित अत्याचारानंतर खून हे आहे. साऱ्या समाजाने या प्रकरणी आता सजग राहून अशा तत्त्वांचा बिमोड केला पाहिजे तरच या प्रवृत्ती मुळापासून नष्ट होतील.

# कृषी महोत्सवातून नमो किसान महासन्मान योजनेचा चौथा हफ्ता–धनंजय मुंडे

परळी वै । प्रतिनिधी

परळी येथील कृषी महोत्सवाच्या माध्यमातून राज्यातील सुमारे एक कोटी शेतकऱ्यांना राज्य शासनाच्या नमो किसान महासन्मान योजनेचा चौथा हफ्ता मुख्यमंत्री, केंद्रीय कृषी मंत्री व मान्यवरांच्या हस्ते आज वितरित करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे.

याच कार्यक्रमाच्या निमित्ताने राज्य शासनाने नुकत्याच जाहीर केलेल्या सोयाबीन–कापूस उत्पादक शेतकऱ्यांना द्यावयाच्या अनुदानाचे वितरण करण्यासाठी सुरू करण्यात येत असलेल्या पोर्टलचेही अनावरण करण्यात येणार आहेत. एकूणच लाडक्या बहिणींच्या पाठोपाठ आता शेतकरीही लाडका ठरणार आहे. आज पासून २५ ऑगस्ट पर्यंत असे पाच दिवसीय राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचे बीड जिल्ह्यातील परळी वैद्यनाथ येथे आयोजन करण्यात आले असुन, परळी व बीड जिल्ह्याच्या इतिहासात राज्यस्तरीय कृषी महोत्सव पहिल्यांदाच होतो आहे. या महोत्सवाचे आज दुपारी १ वाजता दिमाखदार सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार असल्याची माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे. परळी वैद्यनाथ नगरीमध्ये प्रथमच होत असलेल्या राज्यस्तरीय कृषी महोत्सवाच्या उद्घाटन समारंभास महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे त्याचबरोबर केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, मंत्री अब्दुल सत्तार, मंत्री तानाजी सावंत, मंत्री अतुल सावे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रांताध्यक्ष खा. सुनील तटकरे, राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, आ.पंकजाताई मुंडे यांच्यासह राज्यातील व बीड जिल्ह्यातील मान्यवर आमदार, खासदार व लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.



२१ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मैदानावर उभारण्यात आलेल्या भव्य सभामंडपामध्ये या कृषी महोत्सवाचे उद्घाटन संपन्न होणार असून, कृषी प्रदर्शनाच्या भव्य सभामंडपास शेतकरी नेते स्व.पंडित अण्णा मुंडे यांचे नाव देण्यात आले आहे. उद्घाटन समारंभाच्या अगोदर छत्रपती शिवाजी महाराज यांना वंदन करून छत्रपती शिवाजी महाराज चौकातून भव्य रॅली द्वारे मान्यवरांचे स्वागत करण्यात येणार आहे. या कृषी महोत्सवाच्या माध्यमातून पाच दिवसीय भव्य असे कृषी प्रदर्शन, पशुप्रदर्शन, धान्य महोत्सवच, चर्चासत्रे व संवाद, विविध आधुनिक अवजारांची प्रात्यक्षिके, रानभाज्या महोत्सव, यशस्वी शेतकऱ्यांचा सन्मान व त्यांच्या यशोगाथा, त्याचबरोबर महिला बचत गटांनी बनवलेल्या विविध उत्पादनांची विक्री, शेतीतील वेगवेगळया उत्पादनांची उत्पादक ते ग्राहक थेट विक्री, ड्रोन फवारणीची प्रात्यक्षिके, यांसह शेतकऱ्यांना मार्गदर्शक ठरणाऱ्या असंख्य उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सेंद्रिय शेती व नैसर्गिक शेती यांची दालने, भाजीपाला महोत्सव, शेतकरी उत्पादक कंपन्यांनी उत्पादित केलेल्या पदार्थांची थेट विक्री, कृषी विद्यापीठांमधील नवनवीन संशोधनाची प्रात्यक्षिके यांसारखे अनेक उपक्रम नाविन्यपूर्ण पद्धतीने या कृषी महोत्सवात शेतकऱ्यांना अनुभवायला मिळणार आहेत. यासाठी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात कृषी विभागाने जय्यत तयारी केली असून भव्य वॉटरप्रूफ सभामंडप, चर्चा सत्र व अन्य कार्यक्रमांसाठी आणखी मंडप, आसन व्यवस्था, त्याचबरोबर विक्रेत्यांसाठी शेकडो वॉटरप्रूफ स्टॉल्स यासह वाहन पार्किंग, भोजन आदी चोख व्यवस्था करण्यात आली आहे. दरम्यान या कृषी महोत्सवात राज्यभरातून शेतकरी तसेच शेती विषयी आवड असणारे नागरिक सहभागी होणार असून त्यांच्या सर्व मान्यवरांच्या स्वागतासाठी संपूर्ण परळी वैद्यनाथ नगरी सज्ज झाली आहे. बीड जिल्ह्यात राज्यस्तरीय कृषी महोत्सव पहिल्यांदाच होत असल्याने जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यासह कृषी विभागाच्या अधिकारी – कर्मचारी तसेच पदाधिकाऱ्यांमध्ये कमालीचा उत्साह पाहायला मिळत आहे. दरम्यान बीड जिल्ह्यात प्रथमच होत असलेल्या या राज्यस्तरीय कृषी महोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या योजनांसह शेतकरी बांधवांना अनेक प्रकारचे लाभदायक मार्गदर्शन मिळणार असून ही शेतकऱ्यांसाठी एक आगळी वेगळी पर्वणी ठरणार आहे तरी राज्यभरातील शेतकरी बांधवांनी या महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केले आहे.

# पंचायत समितीकडून दलित वस्तीमध्ये निधी खर्च ना करता स्वर्ण वस्तीमध्ये खर्च

अंबड । प्रतिनिधी

अंबड पंचायत समिती गटविकास अधिकारी व इंजिनीयर यांच्या संगणमताने पंचायत समिती अंतर्गत ग्रामीण भागात दलित वस्ती साठी आलेली निधी दलित वस्तीमध्ये खर्च न करता स्वर्ण वस्तीमध्ये खर्च करण्यात आला असल्याची तक्रार अंबड उपविभागीय अधिकारी यांच्याकडे करण्यात आली या निवेदनामध्ये म्हटले आहे की चौकशी करून गटविकास अधिकारी व इंजिनियर यांच्या गुन्हा नोंदविण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे.

अंबड पंचायत समिती अंतर्गत अनुसूचित जाती नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास प्राप्त निधी सन २०२१,२०२२, २ कोटी ७० लाख ९० हजार तसेच २०२२– २०२३, ३ कोटी २९ लाख ३३ हजार ६५८ रूपये असून सदरील विकास कामे दलित वस्ती मध्ये न करता इतरत्र काम करूण योजनेचे उदिष्ट डावलून सबंधीत अभियंता यांनी आर्थीक तडजोडी करूण मागसवर्गीय जनतेला सोयी सुविधा पासून वंचीत ठेवले यामुळे सबंधीत ज्या ज्या विकाणी निधी खर्च करूण काम करण्यात आले त्या ठिकाणी वरिष्ठ अधिकाऱ्या मार्फत जिथे काम झाले त्या ठिकाणी पंचनामा करूण सबंधीत इंजिनिअर व या कामात जे जे अधिकारी कर्मचारी दोषी असतील त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावे असे निवेदन जय भीम सेना संघटनेच्या वतीने देण्यात आले आहे .मागासवर्गीय वस्त्यामध्ये महाराष्ट्र शासनाने मोठ्या प्रमाणात अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे या योजनेचे कोटी रूपये खर्च करूण मागासवर्गीयांचे जीवनमान उंचवावेत या साठी सातत्याने आग्रही असते.अंबड पंचायत समिती अंतर्गत अनुसूचित जाती नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे प्राप्त निधी सन–२०२१,२०२२, २ कोटी ७० लाख ९० हजार तसेच २०२२–२०२३, ३ कोटी २९ लाख ३३ हजार ६५८ रूपये आहे. सदरील निधीचा दुरूपयोग सबंधीत अभियंता यांनी केलेला आहे. त्यामध्ये दलित वस्तीमध्ये कामे करणे गरजेचे असतांना त्या ठिकाणी हा निधी वापरण्यात आलेला नाही. म्हणून आपल्या मार्फत वरीष्ठ अधिकारी यांची लोक दुरुपयोग केला असून त्यांची चौकशी करण्यात यावी. यी कमिटी स्थापन करूण या प्रकरणी चौकशी करण्यात यावी. मागासर्वागिय लोकांचा विकास कामांचा निधी ज्या अधिकाऱ्यांनी आपल्या आर्थीक फायद्यासाठी ईतरत्र वळविला आहे. त्यांच्यावर अनुसूचित जाती जमाती कायद्या नुसार गुन्हा नोंदविण्यात ज्या ज्या ठिकाणी निधी खर्च करूण कामे करण्यात आलेली आहे. त्या ठिकाणी जाऊन स्थळ पाहणी करूण कामाची चौकशी करण्यात यावी. सदरील कारवाई ७ दिवसात सबंधीता विरोधात कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी नसता आपल्या कार्यालया समोर जय भिम सेनेच्या वतीने उपोषण करण्यात येईल याची सर्वस्व जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यावर राहील असा इशारा निवेदनाद्वारे करण्यात आला आहे या निवेदनावर राहुल खरात युवक जिल्हा अध्यक्ष जय भीम सेना, प्रदीप ढेलपे ,राजु चव्हाण,योगेश राठोड ,कैलास राठोड यांच्या स्वाक्षऱ्या आहेत

# हेक्टरी ५ हजार अर्थसाह्यसाठी पीक पेरा नोंदीची अट रद्द–आ.लोणीकर

जालना । प्रतिनिधी

कृषि विभागाने खरीप २०२३ मधील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी हेक्टरी ५ हजार व २ हेक्टरच्या मर्यादेत अनुदान देण्यात येणार आहे. या योजनेत वैयक्तिक किंवा सामूहिक खातेदारांपैकी एकाला लाभ देण्यात येणार आहे. अनुदानाचा लाभासाठी शासनाने ऑनलाईन पीक पेरा नोंदीची जाचक अट घातली होती. या अटीमुळे अनेक शेतकऱ्यांवर अनुदानापासून वंचित राहण्याची वेळ आली होती. याबाबत मंठा परतूर जालना घनसावंगी या तालुक्यातील अनेक शेतकरीनी आमदार बबनराव लोणीकर यांच्याकडे पीकपेऱ्याच्या ऑनलाईन मोदीची जाचक अट रद्द करण्याची मागणी केली होती. शेतकरीनी केलेल्या या मागणीची दखल तात्काळ आ. श्री लोणीकर यांनी मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस उपमुख्यमंत्री अजित पवार कृषिमंत्री धनंजयजी मुंडे यांना यांच्याशी तातडीने मेल द्वारे पत्र व्यवहार करून आणि दूरध्वनी द्वारे संपर्क साधून शेतकऱ्यांच्या व्यथा कळविल्या होत्या.



राज्य सरकारने याबाबत तातडीने दखल घेऊन राज्य सरकारच्या वतीने उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी ऑनलाइन पीकपीरियाची जाचक अट रद्द केल्याच परतुरचे आमदार बबनराव लोणीकर यांच्या प्रयत्नामुळे अट रद्द झाली आहे.तसेच राज्य शासनाच्या वतीने याबाबतीत अधिकृत पत्रक देखील काढण्यात आले आहे. सोयाबीन व कापूस या पिकाची ऑनलाईन पीकपेऱ्याची असलेली जाचक अट रद्द झाल्याने शेतकरी बांधवांना सरसकट कापूस व सोयाबीन पिकाकरिता प्रति हेक्टरी पाच हजार रुपये एवढी अनुदान मिळणार असून दोन हेक्टर ची यात मर्यादा असणार असल्याने शेतकरीमध्ये एक प्रकारे समाधानाचे वातावरण पसरले आहे. महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाकडून खरीप २०२३ मधील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकरी बांधवांना हेक्टरी ५ हजार अधिकतम २ हेक्टरच्या मर्यादित अनुदान स्वरूपात देण्यात येणार आहे. या योजनेसाठी वैयक्तिक खातेदार शेतकरी तसेच सामूहिक खातेदार शेतकऱ्यांपैकी एका व्यक्तीला ह्या अनुदानाचा लाभ देण्यात येणार आहे देण्यात. वैयक्तिक खातेदार शेतकऱ्यांना आधार कार्ड व संमती पत्र तर सामूहिक खातेदार शेतकरी – यांच्यासाठी आधार कार्ड, स्वसाक्षांकित केलेले झेरॉक्स प्रत, सामायिक खातेदार ना हरकत प्रमाणत्र, संमती पत्र मोबाईल क्रमांकसह कृषी सहाय्यक व इतर संबंधित अधिकाऱ्यांकडे जमा करावे असे आवाहन आ.बबनराव लोणीकर यांनी केले आहे.

# पत्रकारांच्या मागण्या संदर्भात येत्या ८ दिवसात मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून निर्णय घेऊ–ना.चंद्रकांत पाटील

**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण भागातील सर्व पत्रकारांच्या समस्या पत्रकार संवाद यात्रेच्या माध्यमातून तसेच प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या प्रस्ताविकातून मी समजावून घेतल्या आहेत. पुढील ८ दिवसात मुख्यमंत्र्यांची वेळ घेऊन आपल्या सोबत स्वतंत्रपणे बैठक करून त्या मागण्यांवर सविस्तर चर्चा करून योग्य तो मार्ग काढण्यात येईल, असे आश्वासन उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी दिले.**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने दिनांक २८ जुलै ते २० ऑगस्ट या कालावधीत पत्रकारांच्या विविध मागण्यांसाठी काढण्यात आलेल्या दीक्षाभूमी ते मंत्रालय या पत्रकार संवाद यात्रेच्या समारोपप्रसंगी आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. राज्याचे पर्यटन मंत्री मंगल प्रभात लोढा, विधान परिषदेच्या नवनियुक्त आमदार पंकजा मुंडे, पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, राज्य संघटक संजय भोकरे, राज्य सरचिटणीस डॉ. विश्वास आरोटे, राज्य समन्वयक संतोष मानूरकर, कार्याध्यक्ष प्रवीण सपकाळे, डिजिटल मिडिया प्रमुख सिद्धार्थ भोकरे, मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी, ज्येष्ठ संपादक किसन भाऊ हासे, कोकण विभागीय अध्यक्ष नितीन शिंदे, कोकण विभागीय कार्याध्यक्ष शैलेश पालकर, विदर्भ विभागीय अध्यक्ष नीलेश सोमाणी, अमरावती अध्यक्ष नयन मुंडे, पश्चिम महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष सुभाष डोके, पुणे विभागीय अध्यक्ष राजेंद्र कोरके पाटील, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष अनिल रहाणे, छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे, प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव, प्रसिद्धी समन्वयक भगवान राऊत, राज्य सदस्य संजय फुलसुंदर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. अलीकडच्या काळात माध्यम क्षेत्र हे असंघटित क्षेत्र झाले आहे. मात्र या क्षेत्रातील लोकांसाठी विद्या, वेतन, आरोग्य विमा, पेन्शन, आजारासाठी मदत व त्यांच्या जीवनात स्थैर्य




कसे आणतात येईल यासाठी सरकार प्रयत्न करेल. जिल्हा दैनिकांसाठी स्वतंत्रपणे जाहिरात धोरण राबविण्यात येईल तसेच पत्रकारांसाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची सूचनाही करण्यात येईल. राज्यसभा आणि विधान परिषदेवर जेव्हा पत्रकारांचा प्रतिनिधी घेण्याची तरतूद होईल. तेव्हा त्या विषयावर बोलणे उचित राहील. मात्र वसंत मुंडे यांना पत्रकारांचे नेते आणि पत्रकार म्हणूनही चांगले भवितव्य आहे असे ते म्हणाले. राज्याचे पर्यटन विकास मंत्री मंगल प्रभात लोढा म्हणाले की, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे या दोघांनीही मला पत्रकार संवाद यात्रेच्या समारोप कार्यक्रमासाठी जाण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यांच्या आज्ञेनुसार मी या कार्यक्रमास आलो असून मी तुमचा निरोप उपमुख्यमंत्र्यांना सांगेल. पत्रकारांनाही या संवाद यात्रेतून नक्कीच न्याय मिळेल. मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री मुंबईला आल्यानंतर या संदर्भात बैठक घेऊ असे ते म्हणाले, पंकजा मुंडे आपल्या भाषणात म्हणाल्या की, दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रा काढल्याबद्दल मी वसंत मुंडे यांचे अभिनंदन करते. त्याचे कारण म्हणजे अशा प्रकारच्या यात्रा फक्त मुंडेंनाच चांगल्या जमतात. गोपीनाथ मुंडे यांनी संघर्ष यात्रा काढली होती. त्यानंतर राज्यात सत्ता परिवर्तन झाले होते. त्यानंतर मी देखील पुन्हा एक संघर्ष यात्रा काढली होती. त्यावेळीही राज्यात सत्ता परिवर्तन झाले होते. आता वसंत मुंडे यांनी पत्रकार संवाद यात्रा काढली आहे. दोन्ही मुंडेंनी काढलेली यात्रा राज्यात सत्ता परिवर्तन घडवून आणणाऱ्या ठरल्या मात्र वसंत मुंडेंनी काढलेली यात्रा आमचं शासन कायम ठेवणारी ठरेल. प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी आपल्या प्रास्ताविकपर भाषणातून पत्रकारांच्या सर्व मागण्या मांडल्या. राज्यशासन जर मतांच्या गठ्ठ्यावरच न्याय देण्याच्या भूमिकेत असेल तर एकेक पत्रकार हा मतांचा गठ्ठा आहे. याचा सरकारने विचार करावा असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. सरकारने आमच्याकडे दयेच्या आणि मायेच्या भूमिकेतून पाहावे अशी विनंती ही त्यांनी केली. राज्य प्रेस कौन्सिलची निर्मिती करावी, अर्थसंकल्पात पत्रकारांसाठी तरतूद करावी अशा प्रमुख मागण्या त्यांनी आपल्या प्रास्ताविकातून केल्या. पत्रकार संवाद यात्रा झाली आणि पत्रकार देखील चांगल्या प्रकारे संवाद साधू शकतो. हे पत्रकारांनी दाखवून दिले. आपली संघटना टिकली पाहिजे. आपण सर्वजण संघटित आहोत हे आज तुम्ही तुमच्या उपस्थितीने सरकारला दाखवून दिले. राहुल गिरी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. विश्वास आरोटे यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी राज्यभरातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान १वरून...

### नाफेडच्या कांदा

असे होताना दिसत नसल्याचे जाधव यांनी म्हटले आहे. यापूर्वी देखील गेल्या महिन्यात नाफेडचे अध्यक्ष जेठाभाई अहिर यांनी नाशिक दौरा केला होता. त्यावेळी त्यांनी कांदा खरेदी करणाऱ्या शेतकरी संस्थांच्या खळ्यांना भेट दिली होती. या भेटीदरम्यान शेतकऱ्यांनी नाफेडच्या कांदा खरेदी विषयी प्रमाणात तक्रारींचा पाढा अहिर यांच्या समोर वाचला होता. तसेच नाफेडच्या कांदा खरेदीत गेल्या काही वर्षापासून सातत्याने भ्रष्टाचार होत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला. मात्र त्यावर अहिर यांनी उपाय काढला जाईल, असे म्हणून वेळ मारून नेली.

-----------

### चिमुकल्यांवर अत्याचारः रेल्वे

माहिती मिळताच मुख्यमंत्री शिंदे यांनी तातडीने शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्याशी चर्चा केली आणि अशा घटना होऊ नयेत म्हणून कायमस्वरूपी ठोस उपाययोजना करण्यास सांगितले. विद्यार्थी किंवा पालकांना अडचणी येत असतील त्यांच्यासाठी प्रत्येक शाळेत एक तक्रार पेटी लावावी, अशी सूचना त्यांनी केली. याशिवाय शाळेतील ज्या कर्मचाऱ्यांचा विद्यार्थ्यांशी सातत्याने संपर्क असतो त्यावर बारकाईने लक्ष ठेवणे आणि त्याचा पाठपुरावा करून त्यांची पार्श्वभूमी माहिती करून घेणे गरजेचे आहे. विद्यार्थिनींना संशय आल्यास संबंधित व्यक्तीस न घाबरता तातडीने प्राचार्य, मुख्याध्यापक किंवा शिक्षकांना निदर्शनास आणून देता आले पाहिजे अशी यंत्रणा हवी. सर्व शाळांमधील शिक्षक आणि कर्मचारी यांच्याशी संस्थाचालकांनी चर्चा करून योग्य ती काळजी घ्यावी. जर संस्थाचालकांची चूक असेल तर त्यांच्यावर देखील कारवाई केली जाईल असे सांगून मुख्यमंत्री शिंदे यांनी रेल्वे आंदोलकांना शांततेचे आवाहन केले.

-------------

### रस्त्यांसाठी ६१ कोटींचा निधी

याबाबत विशेष आभार व्यक्त केले आहेत. आष्टी विधानसभा मतदारसंघात नव्याने मंजुर झालेले रस्ते खालील प्रमाणे १)प्रजिमा–६४ आष्टा ते शिंदेवाडी रस्ता...३कोटी ८४ लक्ष २) राममा–५६१ ते आंधळयाची वाडी रस्ता...४ कोटी ०६ लक्ष, ३) प्रजिमा–६५ सावरगाव ते पत्र्याचा तांडा रस्ता...३ कोटी ३० लक्ष, ४) प्रजिमा–०१ लोणी ते पोकळेवस्ती जिल्हा सरहद्द रस्ता...५ कोटी ०५ लक्ष, ५) प्रजिमा–६४ मातकुळी ते डोकेवस्ती करेवडगाव रस्ता....४ कोटी ५६ लक्ष४, ६) राममा–५४८ ड ते सुरवसेवस्ती रस्ता.. २ कोटी ८९ लक्ष, ७) रामा–७० ते तलवार प्रकल्प (खाडेवस्ती) रस्ता...५ कोटी ९१ लक्ष, ८) प्रजिमा–६८ ते डागवस्ती रस्ता.....३ कोटी ५३ लक्ष, ९) प्ररामा–१६ दौलावडगाव ते कोहक वस्ती रस्ता.... ४ कोटी ९२ लक्ष, १०) राममा–५६१ ते मुटकुळेवस्ती (मांडवा) रस्ता...५ कोटी ०३ लक्ष, ११) प्रजिमा–५ मुगगाव ते गाडे/सुरवसेवस्ती (जोगदंडवाडी) रस्ता... ४ कोटी ८३ लक्ष, १२) राममा–५४८ ड, ते येवलवाडी (नागरगोजे) रस्ता....३ कोटी ८२ लक्ष, १३) प्ररामा–१६ डोंगरकिन्ही ते मुंजारवस्ती रस्ता....१ कोटी ३० लक्ष, १४) राममा–७५२ ई (शिरुर) ते थोरातवस्ती–ब्रम्हनाथ येळंब रस्ता....८ कोटी ०५ लक्ष याप्रमाणे आष्टी विधानसभा मतदारसंघातील विविध भागांमध्ये, एकुण : ६१ कोटी १४ लक्ष रु. किमतीच्या सिमेंट असे कामांना मंजुरी दिली आहे अशी माहिती सा.बा.विभाग स्वीय सहाय्यक विनोद रोडे यांनी दिली आहे.या रस्त्याना मंजुरी मिळाल्यामुळे ग्रामीण भागातील रहदारी सुरळीत होऊन शेतकरी व्यापारी विद्यार्थी या सर्वांना या दर्जेदार रस्त्यांमुळे दळणवळणासाठी उपयोग होणार आहे याबाबत आष्टी विधानसभा मतदारसंघांमध्ये माजी राज्यमंत्री सुरेश धस यांचे जनतेतून कौतुक होत आहे.

--------------

### पेपरच्या बातम्या तथ्यहीन

लोकांसमोर केलेल्या त्यांच्या या वक्तव्याचा दिंद्रुड पत्रकार संघाच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आला आहे. दिंद्रुड येथील संवाद यात्रेत आपल्या सहकाऱ्यांसमवेत आमदार सोळंके सोमवारी सायंकाळी दाखल झाले होते. गावकऱ्यांनी विविध प्रश्नांवर आमदार सोळंके यांना अक्षरशः धारेवर तळाच्या प्रश्नावर आम्ही उपोषणाला बसलो त्यावेळेस तुम्ही आम्हाला भेटायला का आला नाहीत? असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी त्यांना केला. यावेळी त्यांनी गावकऱ्यांनाच प्रतिप्रश्न विचारला की, ''तुम्ही मला एक फोन करायचा, मी आलो असतो.'' त्यावेळेस काही ग्रामस्थांनी दररोज पेपरला बातम्या येत असल्याचे त्यांना सांगितले. तसेच तीन दिवस आमचे उपोषण चालू होते, तुम्ही बातम्या वाचून तरी यायला पाहिजे होतं असे म्हटले. यावर आमदार सोळंके यांनी मी पेपरच्या बातम्या वाचत नाही, कारण त्यात काही तथ्य नसते. यामुळे मी पेपरच्या बातम्या वाचनं सोडून दिले आहे. काय लिहितात आणि काय नाही? असे अजबगजब विधान दिंद्रुड ग्रामस्थांसमोर केले केले. आमदार सोळंके यांचे हे विधान वर्तमानपत्र व त्यांचे प्रतिनिधी यांच्यावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे. त्यामुळे सोळंके यांच्या या वक्तव्याचा दिंद्रुड पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी निषेध केला असून संताप व्यक्त होत आहे.

--------------

### विठ्ठल मंदिरात

देणाऱ्या एका फूलविक्रेत्याविरुद्ध पंढरपूर शहर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुमीत शिंदे असे या पेड दर्शन देणाऱ्या संशयित आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी चेतन शशिकांत कबाडे (रा. वाशिंद खातवली, ता. शहापूर, जि. ठाणे) या भाविकाने पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आरोपीने यासाठी चार हजार रूपये घेतल्याचे समोर आले आहे.

-------

### बोंडअळी व अन्य किडींचा प्रादुर्भाव

आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देशही धनंजय मुंडे यांनी दिले आहेत. या बैठकीस कृषी विभागाच्या सचिव श्रीमती जयश्री भोज, कृषी आयुक्त रवींद्र बिनवडे, कृषी संचालक विनयकुमार आवटे, त्याचबरोबर चारही कृषी विद्यापीठातील या विषयाचे तज्ञ यांसह महत्त्वाचे अधिकारी उपस्थित होते.

cmyk

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि. २१ ऑगस्ट २०२४



## ‘अमृत’च्या लक्षित गटातील युवकांना मिळणार संस्थेमार्फत संगणक कौशल्य विकास प्रशिक्षण

बीड : महाराष्ट्रातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील युवकांना कोणताही विभाग /संस्था अथवा महामंडळ यांचे मार्फत लाभ मिळत नाही, अशा युवकांना संगणक कौशल्या विकसित व प्रशिक्षित बनण्यासाठी आवश्यक कौशल्य, ज्ञान आणि पाठबळ देऊन त्यांना सक्षम करणे आणि उद्योगाभिमुख रोजगाराच्या आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून स्वावलंबनाला चालना देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. त्या अनुषंगाने दि. १६ ऑगस्ट २०२४ रोजी ‘अमृत’ आणि यांच्यामध्ये महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आलाआहे. या करारा अंतर्गत मार्फत राबविण्यात येणाऱ्या काही निवडक प्रशिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना निवड झाल्यावर लाभ देण्यात येईल. ‘अमृत’ तर्फे प्रशिक्षणसाठी निवड झालेल्या युवकांना च्या नियमानुसार सुरुवातीस सुरक्षा शुल्क स्वतः भरावयाचे आहे. योजनेच्या पात्र लाभार्थींनी प्रशिक्षण पूर्ण केल्यावर त्या प्रशिक्षणाचे शैक्षणिक शुल्क अमृत संस्थेमार्फत संस्थेस परस्पर दिले जाईल. यासंबंधी सर्व माहिती अमृतच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येईल. या सामंजस्य कराराच्यावेळी च्या व्यवस्थापकीय संचालक वीणा कामत, संयुक्त व्यवस्थापकीय संचालक समिर पांडे, वरिष्ठ महाव्यवस्थापक अमित रानडे, उप महाव्यवस्थापक डॉ. पाटेकर आणि अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी, विशेष कार्यकारी अधिकारी उदय लोकापल्ली तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी महेश वाघचौरे उपस्थित होते. अमृतच्या लक्षित गटातील जास्तीत जास्त तरुणांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# निवासी डॉक्टर तरुणीच्या हत्येचा अंबाजोगाईमध्ये निषेध

## मार्ड, आयएमएसह सर्व डॉक्टर असोसिएशन, विविध संघटना निषेध मोर्च्यात सहभागी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

पश्चिम बंगालची राजधानी कोलकत्ता येथील आरजी कार मेडिकल कॉलेजच्या निवासी डॉक्टर तरुणीचा वैद्यकीय सेवेत कार्यरत असताना तिचा अमानुष बलात्कार करून तिची निघूर्ण हत्या केल्याच्या निषेधार्थ अंबाजोगाई येथे १७ ऑगस्ट रोजी इंडियन मेडिकल असोसिएशन,मार्ड संघटना, अंबाजोगाई मेडिकल प्रॅक्टिशनर असोसिएशन,सिपीआय संघटना, मॅगमो वैद्यकीय अधिकारी संघटना, नर्सिंग फेडरेशन , एम आर संघटनेच्या वतीने जाहिर निषेध व्यक्त करत या प्रकरणातिल दोषीवर तत्काळ कारवाई करत त्यांना फाशीची शिक्षा देण्याची मागणी करण्यात आली आहे.

या घटनेचा निषेध म्हणून पूर्वीच मार्ड संघटनेने आंदोलन पुकारले आहे त्याला इंडीयन मेडिकल असोसिएशनने संपूर्ण भारतात पाठिंबा देत आपल्या भारतातील सर्व शाखाना या आंदोलनात सहभागघेत या घटनेचा निषेध व्यक्त करावा असे आवाहन केले होते त्यामुळे या आंदोलनाला धार प्राप्त झाली आहे. या घटनेची गंभीरता ओळखून केंद्र सरकारने दोषींना तात्काळ अटक करून जलद गतीने न्यायालयात कठोर कार्यवाही करावी अन्यथा याचे गंभीर परिणाम भविष्यात आरोग्यसेवेबाबत होऊ शकतील असा इशारा मार्ड संघटना व इंडीयन मेडिकल असोसिएशनने सरकारला दिला आहे.

या बाबत अधिक माहिती नुसार कोलकत्ता येथील निवासी डॉक्टर महिलेवर झालेला अमानुष बलात्कार व हत्या तसेच प्रशासनाने तपासणी संदर्भात केलेल्या अक्षम्य चुका व दिरंगाई याच्या निषेधार्थ १७ ऑगस्ट रोजी वरील सर्व संघटनाच्या वतीने १७ ऑगस्ट सकाळी ६ वाजल्या




पासून तर १८ ऑगस्ट सकाळी ६ वाजेपर्यंत वैद्यकीय सेवा बंद करण्यात आल्या. या घटनेच्या निषेधार्त आज १७ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक ते उपविभागीय कार्यालय येथे भव्य रॅली काढण्यात आली. या निषेध मोर्च्यात शहरातील सर्व डॉक्टर, केमिस्ट,लैब टेक्नीशियन, एमआर,विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर मोर्चा सरकारी दवाखाना, शिवाजी चौक, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक असा होत उपविभागीय अधिकारी कार्यालय येथे पोहोचला या ठिकाणी सर्व डॉक्टर मंडळीच्या वतीने उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले सदर निवेदनात नमूद करण्यात आले आहे की ९ ऑगस्ट २०२४ रोजी आरजी कार मेडिकल कॉलेज कोलकत्ता येथील निवासी डॉक्टर तरुणीवर अमानुष बलात्कार करून तीची निघूर्ण हत्या करण्यात आली या प्रकरणाच्या तपासा मध्ये स्थानिक पोलिस व कॉलेज प्रशासनाच्या वतीने पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न होत आहे १५ ऑगस्ट रोजी जमावाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थयांवर हमला करून तोड़फोड़ केली त्यानंतर हे प्रकरण सीबीआय कड़े वर्ग केल्या गेले या सर्व घटनाक्रमावरुन एकंदरित सर्वच महिलांची सुरक्षा धोक्यात आली असून सर्वच क्षेत्रात काम करणाऱ्या महिलां व मुलीच्या सुरक्षेसाठी सरकारने विशेष प्रयत्न करावे अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

यावेळी वुई वॉन्ट जस्टीस, सुरक्षा हमारा अधिकार है, हत्यारे को फाशी दो या घोषणांनी सर्व परिसर दणाणून गेला होता.

यावेळी उपविभागीय अधिकारी कार्यालयात डॉ राजेश इंगोले, अँपाच्या डॉ सुलभा पाटील, डॉ शुभदा लोहिया, डॉ संदीप थोरात,डॉ श्रीनिवास रेड्डी, कॉ बभ्रुवाहन पोटभरे, डॉ नवनाथ घुगे, डॉ निलेश पुरी, डॉ केदार, माड्र्सचे डॉ गौरव शिसोदे,डॉ राहुल मुंडे यांनी आपल्या सहवेदना व्यक्त करत आरोपींना त्वरित आणि कडक शिक्षा व्हावी व डॉक्टर्स करिता केंद्रीय संरक्षण कायदा त्वरित लागू करावा अशी मागणी केली. या आंदोलनामुळे रुग्णांना त्रास होत असल्याबाबत सर्व डॉक्टर्सनी दिलगिरी व्यक्त करत आता नाईलाजास्तव सरकारी अनास्थेमुळे आम्हाला हे आंदोलनाचे पाऊल उचलावे लागत आहे अशी खंत व्यक्त केली.

## तू अशा बातम्या देत आहेस,जणू तुझ्यावरच बलात्कार झाल आहे-बदलापूरच्या माजी नगराध्यक्षाची मस्तवाल भाषा

मुंबई । प्रतिनिधी

सत्तेचा माज काय असतो हे आज बदलापूर मध्ये दिसले. बदलापूर येथील अत्याचाराचे वार्तांकन करणाऱ्या एका महिला पत्रकाराशी बोलताना बदलापूरचे माजी नगराध्यक्ष वामन म्हात्रे यांनी असभ्य आणि संतापजनक भाषेत अरेरावी केली. ते म्हणाले ‘‘तू अशा बातम्या देत आहेस, जणू तुझ्यावरच बलात्कार झाला आहे,‘‘ वामन म्हात्रे यांच्या या वक्तव्याचा अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती आणि डिजिटल मिडिया परिषदेने तीव्र शब्दात निषेध केला असून वामन म्हात्रे यांच्यावर कडक कारवाई करावी अशी मागणी एस.एम देशमुख यांनी केली आहे.

या संदर्भात सविस्तर माहिती अशी की, बदलापूर येथील एका नामांकित शाळेत साडेतीन वर्षांच्या दोन चिमुकल्यांवर अत्याचार झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी आज सकाळी साडे सहा वाजता बदलापूर पूर्व येथील आदर्श शाळेबाहेर पालक आणि नागरिकांनी आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनात काही आंदोलकांनी सकाळी साडे दहाच्या सुमारास हा मोर्चा बदलापूर रेल्वे स्थानकाकडे वळवला. आंदोलकांनी मुंबईकडे जाणारी आणि मुंबईहून येणारी अशी दोन्ही रेल्वे सेवा बंद केली. या घटनेचा सर्वत्र निषेध व्यक्त होत असून पत्रकारांनीही हा विषय लावून धरला आहे.

मुंबईकडे जाणारी आणि मुंबईहून येणारी अशी दोन्ही रेल्वे सेवा बंद केली. या घटनेचा सर्वत्र निषेध व्यक्त होत असून पत्रकारांनीही हा विषय लावून धरला आहे. याच कारणावरून बदलापूरचे माजी नगराध्यक्ष वामन म्हात्रे यांची एका महिला बातमीदारासोबत बोलताना जीभ घरसली आहे. तू अशा बातम्या देत आहेस, जणू तुझ्यावरच बलात्कार झाला आहे, अशा भाषेत म्हात्रे यांनी महिला बातमीदारावर आगपाखड केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जिल्ह्यात एक पुढारी महिलांबद्दल अशी भाषा वापरतो हे अत्यंत निंदनीय असून मुख्यमंत्र्यांनी याची दखल घेऊन वामन म्हात्रे यांच्यावर कारवाई करावी अशी मागणीही एस.एम.देशमुख यांनी केली आहे.

## माजलगावात गोपाळकाला निमित्त दहीहंडीचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील हनुमान मंदिरामध्ये दिनांक २० ऑगस्ट रोजी युवा नेते सुशील (भैय्या) डक यांच्या अध्यक्षतेखाली दहीहंडी संयोजन समितीची बैठक संपन्न झाली.

या बैठकीमध्ये गोपाळकाला निमित्त २७ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ ते रात्री १० पर्यंत हनुमान चौक या ठिकाणी हा दहीहंडी महोत्सव माजलगावकरांना पहावयास मिळणार असल्याचे संयोजन समिती कळविले आहे व या बैठकीत पुढील कार्यकारणी ठरविण्यात आली यामध्ये अध्यक्षपदी राम सोळंके, उपाध्यक्षपदी अजित गायकवाड ,कोषाध्यक्षपदी केशव कोथिंबीरे ,सचिवपदी बालाजी येवले, यांची निवड करण्यात आली तसेच या बैठकीत प्रमुख उद्घाटक म्हणून मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक (आबा ) डक यांच्या हस्ते विजेत्या गोविंदा पथकास ५१ हजार रुपयांचे बक्षीस देण्यात येणार असून या या दहीहंडी महोत्सवामध्ये जास्तीत जास्त गोविंदा पथकांनी सहभागी व्हावे व ज्यांना नाव नोंदणी करायची त्यांनी राम सोळंके-७०५७०४१३१४ केशव कोथिंबीरे-९१३०३३४५४९ मयूर वाकळे-८०८७८८१०६५ अजित गायकवाड-९५७९५५७२३४ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन अजिंक्य भैय्या डक,बंडूभाऊ गायकवाड ,अवधूत सोळंके, गोपाळ पैंजणे, राजेंद्र केंदळकर, नितीन गायकवाड,मनोज आडे, प्रसाद देशमुख, प्रतीक जाधव, प्रशांत सोळंके, शशिकांत गायकवाड, अनिल शेंडगे,मारुती शिंदे, विकास चव्हाण,मंगेश आवटे,मयूर वाकळे यांनी केले आहे.

## जेष्ठ नागरिकांना तीर्थक्षेत्र यात्रा घडवणारी ‘मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना’

बीड । प्रतिनिधी

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत जेष्ठ नागरीकांना तीर्थ दर्शन यात्रेची मोफत संधी देण्यासाठी ‘मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजन’ सुरु करण्यात आली आहे. बीड जिल्हयातील वय वर्ष ६० किंवा त्याहून अधिक वयाचे आहेत त्यांना राज्य आणि भारतातील तीर्थक्षेत्रांना मोफत भेटीची दर्शनाची संधी देण्यासाठी ‘मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना’ सुरु करण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत राज्यामधील ज्येष्ठ नागरिकांसाठी तीर्थक्षेत्र यात्रा मोफत उपलब्ध करुन देणे, सदर योजनेंतर्गत निर्धारीत तीर्थ स्थळांपैकी एका स्थळाच्या यात्रेकरिता पात्र व्यक्तीला या योजनेचा एकवेळ लाभ घेता येईल तसेच प्रवास खर्चाची कमाल मर्यादा प्रती व्यक्ती रुपये ३०.०००/- (अक्षरी रुपये तीस हजार) फक्त इतकी राहील जेष्ठ नागरीकांनी योजनेचे माहिती प्राप्त करण्यासाठी व योजनेसंबधी अधिक माहितीसाठी डॉ. बाबासाहेव आंबेडकर, सामाजिक न्याय भवन बीड या कार्यालयाशी संपर्क साधावा व जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण बीड यांनी केले आहे.

योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

योजनेच्या लाभासाठी दि. ३१.०१०२०२४ पूर्वी ऑफलाईन अर्ज तदनंतर ऑनलाईन अर्ज,लाभार्थ्यांचे आधारकार्ड / रेशन कार्ड, महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र / महाराष्ट्र राज्यातील जन्म दाखला.लाभार्थ्यांचे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर त्याऐवजी त्या लाभार्थ्यांचे १५ वर्षाचे रेशनकार्ड तथा ओळखपत्र, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, जन्म दाखला या चारपैकी कोणतेही ओळख धरण्यात येईल ),सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुंटूब प्रमुखाचा उत्पन्नाचा दाखला, (वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाखापर्यंत असणे अनिवार्य) किवा पिवळे / केशरी रेशनकार्ड,वैद्यकीय प्रमाणपत्र,पासपोर्ट आकाराचा फोटो, जवळच्या नातेवाईकाचा मोबाईल क्रमांक, सदर योजनेच्या अटी शर्तीचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र ही कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

## आपत्ती व्यवस्थापन जनजागृती रॅली/मिनी मॅरेथॉन स्पर्धे मध्ये तुलसीची पुनम बातरा द्वितीय




बीड । प्रतिनिधी

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जिल्हाधिकारी कार्यालय, बीड आपत्ती व्यवस्थापन शाखा यांच्या वतीने दि.१९ ऑगस्ट रोजी सकाळी ०७.०० वा अंबिका चौक बीड ते संत सेवालाल महाराज चौक रिलायंस पेट्रोल पंपा पर्यंत आपत्ती व्यवस्थापन जनजागृती रॅली आणि मिनी मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईनचे प्राचार्य डॉ. अशोक धुलधुले यांनी विद्यार्थिनींना प्रोत्साहन दिले.

राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण महाराष्ट्र शासन यांनी आयोजित केलेल्या ‘‘महा मॅरेथॉन २०२४- एक धाव सुरक्षेची‘‘ या कार्यक्रमात तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन बीड येथील विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता. यामध्ये तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाइनिंग ची विद्यार्थिनी पूनम संतोष बात्रा हिने द्वितीय क्रमांक मिळविला आहे. तिला आयोजकांकडून प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच तुलसी फॅशन डिझाइनिंगच्या विद्यार्थिनी यांनाही सहभागाबद्दल प्रशस्तीपत्र देण्यात आले. यावेळी तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन बीड येथील सहाय्यक प्राध्यापिका सुप्रिया ससाने, श्वेता वंजारे, पूजा बिलपे उपस्थित यांची उपस्थिती होती.

पान ६ वरून...

### आरक्षण विरोधी निर्णयाच्या

आहे. दिलेला निर्णय असंविधानिक असून या निर्णयाच्या विरोधात बुधवार दि.२१ ऑगस्ट २०२४ रोजी पुकारलेल्या भारत बंदला रिपाइंचे जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णयाच्या विरोधात अनुसूचित जाती, जमातीच्या वतीने पुकारलेल्या भारत बंदमध्ये रिपाइं पदाधिकारी यांनी सामील व्हावे.असे आवाहन राजू जोगदंड,किसन तांगडे, मायाताई मिसळे, अविनाश जोगदंड, महेश आठवले, बापू पवार, प्रभाकर चांदणे, विलास जोगदंड, महेंद्र वडमारे, भैय्यासाहेब मस्के, रतन वाघमारे,बागदेव वाघमारे, सुभाष तांगडे,दिलीप खंदारे, अक्षय कोकाटे, श्याम वीर, अप्पा मिसळे, गणेश वाघमारे, भैय्यासाहेब साळवे, सोनू वडमारे, सनी जोगदंड आदींनी केले आहे.

### विद्यार्थिनीनी केले मूकबधीर

जिजाऊ विद्यालय शालेय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये त्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी वेगवेगळे अनोखे उपक्रम नेहमीच राबवत असते चार भिंतीतील शिक्षणापेक्षा सामाजिक शिक्षण आहे तेवढेच महत्त्वाचे असते. याप्रसंगी मानव विकास निवासी विद्यालयाचे मुख्याध्यापक आनंद टाकळकर सर व जिजाऊ विद्यालयाच्या सहशिक्षिका उपस्थित होत्या.

### आरक्षण लढ्यात संघर्ष करत

दूर ठेवले आहे. त्यामुळे आपले प्रश्न सुटण्याऐवजी जटील होत चालले आहेत. कोण परका आणि कोण आपला याचे निरीक्षण समाजाने करावे, कारण आजघडीला तशी परिस्थिती निर्माण झाली आहे. कोणतेही राजकारण उभे राहत असतांना, सामाजिक मुद्दे घेऊन उभा राहत असते. मात्र आपली आरक्षण बचाओ पदयात्रा फक्त हक्क आणि न्याय मागणी घेऊन निघालेली आहे. त्यामुळे आपल्या सर्वांचा हेतू समाजाप्रति अतिशय निर्मळ आहे. म्हणून ओबीसी, दलित, अल्पसंख्याक आरक्षण बचाओ पदयात्रेत ठिक ठिकाणचे लोक सहभागी होत आहेत. कारण हा लढा त्यांच्या मुला-बाळांना त्यांचे हक्क व अधिकार मिळवून देणार आहे. त्यामुळे आपणही जीवाची पर्वा न करता आरक्षण बचाओ लढ्यात आणि समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी सर्वात पुढे राहुत असा विश्वास आणि शब्द मयूरीताई बाळासाहेब खेडकर-मस्के यांनी पदयात्रेच्या प्रत्येक गावात समाजाशी बोलतांना व्यक्त केला. दरम्यान पदयात्रेत सुघोष नारायण मुंढे, पी.टी. चव्हाण सर, परमेश्वर वाघमोडे, प्रियंका शिवप्रसाद खेडकर, बाबुराव शेंडगे, शिवराम शिरगिरे,बजरंग सानप, छायाताई मराठे, भारत देवकते, दादासाहेब मस्के, आकाश कोकरे, कबीर सोनवणे, बाळासाहेब मस्के, समीर सय्यद,अशोक भालेकर, ऋषिकेश मराठे, रवी खनके,ऋषिकेश माहारनोर, कल्याण सोनवणे, संतोष कांबळे आदीजन सहभागी झाले आहेत.

### शेतकरी बांधवांनी परळी

लावण्यात येणार आहेत. तसेच परिसंवाद, राज्यातील सर्व कृषी विद्यापीठाची दालने, विविध संशोधन केंद्र, कृषी विज्ञान केंद्र, प्रक्रिया उद्योग यांचे विशेष सादरीकरण होणार आहे.

सदरील पाच दिवसाच्या कालावधीमध्ये पौष्टीक तृणधान्य महोत्सव, सेंद्रीय शेती दालन, खरेदीदार विक्रेता संमेलन, पशू प्रदर्शन,ड्रोन द्वारे फवारणी प्रात्यक्षिक, रानभाजी महोस्तव,धान्य व इतर शेतीमाल प्रदर्शन व विक्री, शेती निगडीत औजारे खरेदी विक्री दालन व कृषि उत्पादने, स्वयं सहाय्य महिला बचत गट निर्मित वस्तू /पदार्थ विक्री भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात येणार आहे. महोत्सवात पाच लाखापेक्षा जास्त शेतकरी भेट देतील असे नियोजन करण्यात आलेले आहे. मानवी आरोग्यामध्ये सकस अन्नाचे अनन्य साधारण महत्व आहे. सकस अन्नामध्ये विविध भाज्यांचा समावेश असतो. रानातील म्हणजेच जंगलातील तसेच शेतशिवारातील नैसर्गिकरित्या उगवल्या जाणाऱ्या रानभाज्या, फळभाज्या, कंदभाज्यांमध्ये विविध प्रकारचे शरिराला आवश्यक असणारे पौष्टिक अन्नघटक व औषधी गुणधर्म असतात. तसेच सदर रानभाज्या नैसर्गिकरित्या येत असल्यामुळे त्यावर रासायनिक किटकनाशक / बुरशीनाशक फवारणी करण्यात येत नाही. त्यामुळे पुर्णपणे नैसर्गिक असल्याने या संपत्तीचा योग्य वापर करणे आवश्यक आहे. त्यांचे आरोग्य विषयक महत्व व माहिती जास्तीत जास्त ग्रामिण तसेच शहरी भागातील नागरिकांना होणेसाठी व विक्री व्यवस्था करुन रानभाज्यांच्या विक्रीतून शेतकऱ्यांनाही काही आर्थिक फायदा होणेसाठी लोकांमध्ये याबाबत जनजागृती करणेसाठी रानभाज्यांचे प्रदर्शन देखील या कृषी महोत्सवामध्ये आयोजित करण्यात आले आहे.

या महोत्सवात कृषी संलग्न विभागांचाही सक्रिय सहभाग असणार आहे.तरी राज्यातील जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी कृषी महोत्सवास भेट देऊन लाभ घेण्याचे आवाहन ,महाराष्ट्र राज्याचे कृषी मंत्री धनंजय मुंडे, यांनी राज्यातील शेतकरी बांधवाना केलेले आहे. रविंद्र बिनवडे भा प्र से, तसेच दिपाली कदम, अश्विनी भोपळे, अशोक किरनळ्ळी आयुक्त, कृषि बी टी एम उपसंचालक आत्मा (सामेती) कृषि संचालक (आत्मा) महाराष्ट्र राज्य, पुणे आदि यात सहभागी होणार आहेत.

# घोडके परिवाराने पर्यावरणाशी नाते जपले

आष्टी । प्रतिनिधी

ग्लोबल वार्मिगचे युगामध्ये प्रत्येकाने पर्यावरणाची बांधिलकी जपली पाहिजे. त्याचा पायंडा आज पारोडी मध्ये घोडके परिवाराने घातला आहे. आजीच्या दशक्रिया विधीच्या कार्यक्रमात सुमारे २०० आंब्याच्या रोपांचे वाटप केले. घोडके परिवाराने पर्यावरण पूरक उपक्रम राबवून समाजाला एक वेगळा आदर्श घालून दिला, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे माजी सभापती उद्धव दरेकर यांनी केले.

तालुक्यातील पारोडी येथील कै. लक्ष्मीबाई दत्तोबा घोडके यांचा दशक्रिया विधीचा कार्यक्रम नुकताच झाला. यावेळी राजेंद्र महाराज गाढवे यांचे प्रवचन झाले. घरामध्ये दुःखद घटना घडली असली तरी पारंपरिक विधी बरोबरच आपण निसर्गाचे काहीतरी देणे लागतो विचारातून आणि दादासाहेब घोडके यांच्या संकल्पनेतून दशक्रिया विधीसाठी आलेल्या प्रत्येक व्यक्तीला आंब्याचे रोपटे देण्यात आले.

याप्रसंगी जिल्हा परिषदेचे माजी सभापती उद्धव दरेकर, माजी जिल्हा परिषद सदस्य सतीश शिंदे, सरपंच सागर आमले, सरपंच राधेश्याम धस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष परमेश्वर शेळके, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष काकासाहेब शिंदे, शिवसेना नेते भाऊसाहेब लटपटे, अमोल तरटे, डॉ. संतोष जाधव, रविंद्र ढोबळे, माजी पंचायत समिती सदस्य डॉ. सुभाष वाळके, सरपंच जयसिंग गव्हाणे, कडा बाजार समितीचे माजी



उद्धव दरेकर, आजीच्या स्मरणार्थ २०० आंबा रोपांचे वाटप

सभापती अशोक इथापे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब घुले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष महादेव डोके, सरपंच संदिप खकाळ, अव्वल कारकून भगीरथ धारक, सरपंच विजय गाढवे, सरपंच परिषदेचे अध्यक्ष दत्ता काकडे, प्रा. भवर सर, नवनाथ गर्जे, अभय गर्जे, शिवाजी शेकडे, विजय शेळके, राजेश कराड, श्रीराम गोंदकर, संतोष गुंड, बाळासाहेब गव्हाणे, संजय विधाते, बाळासाहेब झांबरे, सरपंच सासवडे सर, बाळासाहेब कावरे, सुभाष वाळके, बाबासाहेब बिटे, सरपंच विकास अमृते, प्रविण लाळगे, नितीन मिसाळ, हनुमंत पोटरे, मनोहर सरोदे, अतुल खकाळ, बाळासाहेब निकम, हरिभाऊ दहातोंडे, सरपंच भरत जाधव, संजय विधाते, संभाजी आंधळे, शामराव फसले, ताराचंद कानडे, सुहास जगताप, जालिंदर कानगुडे, उद्धव विधाते, अक्षय लटपटे, मधुकर वाळके, पांडुरंग शेलार, गणेश धस, कैलास दोरगे, जगताप पाटील, निलेश शितोळे, सुंबे महाराज, रेवणनाथ जाधव, अभिजीत जंजिरे, नाना आमले, बाळासाहेब कावरे, पत्रकार डॉ. सूर्यकांत वरकड, बबन विधाते, वाळुंजचे सरपंच सातपुते, सरपंच बंकट परकाळे, तालुक्यातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, नातेवाईक व मित्र परिवार, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उद्धव दरेकर म्हणाले, घोडके परिवारातील आजीचा नातू दादा हा माणसं जोडणारा माणूस आहे. त्यामुळेच आज एवढं माणसांचं वैभव आपल्याला या ठिकाणी पाहायला मिळते. आजीचे विचार चिरंतन स्मरणात राहावे. त्यातून कुटुंबाला प्रेरणा मिळावी. याच संकल्पनेतून घोडके परिवाराने आलेले नातेवाईकांना आंब्याचे रूप देण्याचा उपक्रम राबवला. हा उपक्रम खरोखरच कौतुकास्पद आहे. यातून इतरांनी बोध घ्यावा असे ते म्हणाले. शेवटी रोजगार हमी योजनेचे कार्यक्रम अधिकारी दादासाहेब घोडके यांनी आभार मानले.

पारोडी : आजीच्या दशक्रिया विधीनिमित्त वृक्ष वाटप करताना दादासाहेब घोडके, सुंबे महाराज, राजेंद्र महाराज गाढवे आदी.

cmyk




# नगरच्या शेतकऱ्याने केली २७ एकरात चंदनाची लागवड

## कोट्यवधींची उलाढाल, पण चंदनाची शेती लिगल आहे का?

सुवासिक गुणधर्मांमुळं चंदनाच्या झाडाला विशेष महत्व. भारतात कर्नाटक, तमिळनाडू, तेलंगणा, आंध्र प्रदेशात मोठ्या प्रमाणावर खरंतर या चंदनाची शेती होते. पण आता महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनाही चंदनाच्या शेतीनं भूरळ घातली आहे. महाराष्ट्रातल्या नगर जिल्ह्यातील एका शेतकऱ्यानं तब्बल २७ एकरावर चंदनाची लागवड करत कोट्यवधी रुपयांची उलाढाल केली आहे. राजेंद्र रावसाहेब गाडेकर या प्रयोगशील शेतकऱ्यानं माळरानावर काही फळपिकांसोबत चंदनाची १४ हजार चंदनाची झाडं लावली. राज्य आणि केंद्राच्या अनेक योजनांचा लाभ घेत त्यानं चंदनाचा मळा फुलवलाय. आज ते आपल्या शेतीतील चंदनातून वेगवेगळे पदार्थही तयार करतात. विशेष म्हणजे स्वत:ला आर्थिक फायदा झाल्यानंतर त्यांनी परिसरातील जवळपास ४०० शेतकऱ्यांनाही चंदन शेतीसाठी हातभार लावलाय. त्यामुळं या शेतकऱ्याची नगर जिल्ह्यात चांगलीच चर्चा आहे.

कशी केली चंदनाची शेती?

गाडेकर यांनी तमिळनाडूच्या मदुराईतून २०१७-१८ मध्ये पांढऱ्या चंदनाची रोपे आणली. दोन टप्प्यात चंदनाची लागवड करत एकाच वर्षत सुमारे २७ एकरात डाळिंब, संत्री, आवळा यासह चिंदनाची १४ हजार रोपं त्यांनी लावली. शेतात असा प्रयोग करणारे नगरमधले ते पहिलेच शेतकरी ठरलेत. या पिकांना योग्य पाणी मिळावं यासाठी ठिबकसिंचनाची सोय करत सामुहिक शेततळे योजनेतून ७५ लाख लिटर क्षमतेचे शेतततळे बांधले. शिवाय दोन विहिरींचा आधारही होताच. चंदनाला आठवड्याला अवघे ४ लिटर पाणी पुरते.



२७एकरात १४ हजार चंदनाची झाडे

गाडेकर यांनी २७ एकर जमिनीवर १४ हजार चंदनाची झाडं लावली आहेत. यातून त्यांना कोट्यवधी रुपयाचा फायदा झाला असून कमी पाण्यात आणि कमी खर्चात त्यांनी चंदन शेती करत आर्थिक प्रगती साधली आहे. चंदनाच्या झाडापासून ते धूप आगरबत्ती,, तेल, पावडर अशा अनेक गोष्टी तयार करून विकतात. यातून त्यांना मोठे यश मिळालं आहे.चंदनाच्या झाडला साधारण तीन वर्षात बीया येतात. या बियांना ३०० ते ६०० रुपये प्रतिकिलो दर मिळतो. चंदनाचे झाड स्वत: अन्न तयार करत नाही. त्यामुळे शेजारी कडूलिंबाचे झाड असेल तर वाढीला फायदा होतो.

चंदनाची शेती कायदेशीर आहे का?

भारतात चंदनाला सोन्याएवढं महत्व आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत दर्जेदार सुवास आणि उच्च प्रतिच्या चंदन तेलामुळे हे बेकायदेशीर असल्याचा गैरसमज असून भारतासह महाराष्ट्रात चंदनाची लागवड करणं संपूर्णत: कायदेशीर आहे. चंदन लागवडीसाठी कोणत्याही सरकारी संस्थेची अथवा विभागाची परवानगी लागत नाही. पण चंदनाची लागवड करत असाल तर काही कायदेशीर बाबी पूर्ण केल्या की लागवड करता येते. चंदनाची लागवड केल्यानंतर आधी तलाठ्याकडून सातबाऱ्यावर नोंद करून वन विभागाची परवानगी घ्यावी लागते. यासाठी महाराष्ट्र सरकारची चंदन कन्या योजनाही आहे. त्यातून शेतकऱ्याला १५ ते २० लाख रुपयांचा लाभ मिळतो.

# सोमेश्वर सहकारी साखर कारखाना

## शेतकऱ्यांना सर्वाधिक दर देणारा कारखाना



बारामती: बारामती तालुक्यातील श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याने गत गाळप हंगामात शेतकऱ्यांना सर्वाधिक दर देऊन एक विक्रमचंचप पाडला आहे. कारखान्याने एफआरपीपेक्षा ६९७ रुपये अधिक दर देऊन शेतकऱ्यांना प्रति टन ऊसाला ३७७१ रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे. कारखान्याचे अध्यक्ष पुरुषोत्तम जगताप यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, संचालक मंडळाच्या बैठकीत हा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मार्गदर्शन आणि संचालक मंडळाच्या काटकसरीच्या धोरणामुळे हा निर्णय शक्य झाला आहे.

राज्यातील अन्य कारखान्यांना मदत

सोलापूरचे अभिजीत पाटील, सांगलीचे मानसिंग नाईक यांच्यासह नव्या पाच कारखान्यांना मदत करण्यासाठी आणि १६ कारखान्यांच्या यादीचा नवा प्रस्ताव () तयार करण्यात आला. गत हंगामात कारखान्याने एकूण ५ लाख २३ हजार ८७६ मेट्रिक टन ऊसाचे गाळप केले. यातील जानेवारीमध्ये तुटलेल्या ऊसाला ३६४६ रुपये, फेब्रुवारीमध्ये ३६७१ रुपये, मार्चसाठी ३७२१ रुपये आणि मार्चनंतर तुटलेल्या ऊसाला ३७७१ रुपये दर देण्यात आल

कारखान्याचे उत्कृष्ट कामगिरी

कारखान्याने गत हंगामात ३५७१ रुपये उच्चांकी ऊसदर जाहीर केला होता. १५ लाख २३ हजार ८७६ मेट्रिक टन ऊसाचे गाळप करून १८ लाख २६ हजार ५०० साखर पोत्यांचे उत्पादन घेतले. कारखान्याची रिकव्हरी १२.२१ टक्के होती.कारखान्याचे चेअरमन पुरुषोत्तम जगताप यांनी सांगितले की, कारखान्यावर डिस्टलरी प्रोजेक्ट, को-जनरेशन आणि साखर विक्रीला चांगला दर मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना चांगला दर देणे शक्य झाले. पुढील काळात दिवसाला १३५००० लिटर अल्कोहोल निर्मिती करणाऱ्या प्रकल्पाचे काम सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

महत्त्वाचे मुद्दे: सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याने शेतकऱ्यांना सर्वाधिक दर दिला. एफआरपीपेक्षा ६९७ रुपये अधिक दर देण्यात आला. कारखान्याने ५ लाख २३ हजार ८७६ मेट्रिक टन ऊसाचे गाळप केल.

# छत्रपती संभाजीनगरसाठी पीक विम्यापोटी मिळाले ३७० कोटी

संभाजीनगर :नैसर्गिक आपत्तीमुळ नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. जिल्ह्यातील ४ लाख ३८ हजार २०३ शेतकऱ्यांपैकी ३ लाख ६४ हजार ७९९ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात तीन टप्प्यांत एकूण ३७० कोटी ८५ लाख रुपयांची पीक विमा रक्कम जमा झाली आहे.



जिल्हा प्रशासनाने शेतकऱ्यांच्या तक्रारींची दखल घेत विमा कंपन्यांवर तातडीने रक्कम वितरण करण्यासाठी दबाव आणला. त्यामुळे शेतकर्यांना मोठ्या प्रमाणात मदत झाली आहे. जिल्ह्यातील सोयगाव आणि वैजापूर तालक्यातील शेतकऱ्यांना पीकविम्याचा सर्वाधिक लाभ मिळाला आहे. या दोन्ही तालुक्यांमध्ये ९८% पेक्षा अधिक शेतकऱ्यांना विमा लाभ मिळाला आहे. तर फुलंब्री तालुक्यातील शेतकऱ्यांना सर्वात कमी लाभ मिळाला आहे. छ. संभाजीनगर तालुक्यातील ३४,१६७ शेतकऱ्यांनी विमा काढलेला होता त्यापैकी २६,५७८ शेतकऱ्यांना २४.५३ कोटी विमा मिळालेला आहे.

गंगापूर तालुक्यातील ६०,७८३ शेतकऱ्यांनी विमा काढलेला होता त्यापैकी ५३,८७८ शेतकऱ्यांना ५७.८६ कोटी विमा मिळालेला आहे. कन्नड तालुक्यातील ६७,१९६ शेतकऱ्यांनी विमा काढलेला होता त्यापैकी ५८,२०४ शेतकर्यांना ५१.७१ कोटी विमा मिळालेला आहे. खुलताबाद तालुक्यातील २०,४४१ शेतकऱ्यांनी विमा काढलेला होता त्यापैकी १३,८७७ शेतकऱ्यांना १०.१० कोटी विमा मिळालेला आहे. पैठण तालुक्यातील ५४,६०६ शेतकऱ्यांनी विमा काढलेला होता त्यापैकी ३५,७४३ शेतकऱ्यांना २६.४४ कोटी रू. विमा मिळालेला आहे. फुलंब्री तालुक्यातील ३६,३६७ शेतकऱ्यांनी विमा काढलेला होता त्यापैकी १९,२६३ शेतकर्यांना १४.८८ कोटी रू. विमा मिळालेला आहे. सिल्लोड तालुक्यातील ६१,६७१ शेतकऱ्यांनी विमा काढलेला होता त्यापैकी ५५,३०५ शेतकऱ्यांना ४८.७३ कोटी रू. विमा मिळालेला आहे. सोयगाव तालुक्यातील २०,८५७ शेतकऱ्यांनी विमा काढलेला होता त्यापैकी २०,७८७ शेतकऱ्यांना ३१.१४ कोटी रू. विमा मिळालेला आहे. वैजापूर तालुक्यातील ८२,११५ शेतकऱ्यांनी विमा काढलेला होता त्यापैकी ८१,१६४ शेतकऱ्यांना १०५.४५ कोटी रू. विमा मिळालेला आहे.

एकूण ४,३८,२०३ शेतकऱ्यांपैकी ३,६४,७९९ शेतकऱ्यांना ३७०.८५ कोटी रू. विमा मिळाला आहे. शेतकरी संघटनांनी जिल्हा प्रशासनाच्या या प्रयत्नांचे स्वागत केले असून त्यांनी शेतकऱ्यांना विमा लाभ मिळण्यासाठी केलेल्या प्रयत्नांसाठी जिल्हा प्रशासनाचे आभार मानले आहेत.

# मूग, उडीद पिकांवरील कीड व्यवस्थापन

खरीप हंगामातील मूग व उडीद ही कडधान्य पिके अल्पावधीत तयार होतात. मूग २४ ते २५ टक्के आणि उडीद २० ते २२ टक्के इतक्या प्रमाणात प्रथिनांचा पुरवठा करणारी महत्त्वाची पिके आहेत. या पिकांवर प्रामुख्याने मावा, तुडतुडे, फुलकिडे व पांढरी माशी या रसशोषक किडी प्रादुर्भाव दिसतो. तर कळी, फुलोरा आणि शेंगा भरण्याच्या अवस्थेत हेलिकोव्हर्पा तसेच शेंगा पोखरणाऱ्या अळ्यांचा प्रादुर्भाव आढळून येतो.

मावा : कोवळ्या फांद्या, फुले व शेंगांवर माव्याचे प्रौढ व पिले यांची वसाहत आढळून येते. प्रौढ व पिले रस शोषण करतात, त्यामुळे पाने वेडीवाकडी होण्यासोबतच रोपेही सुकतात. माव्याद्वारे उत्सर्जित चिकट गोड पदार्थावर काळ्या बुरशीची वाढ होऊन प्रकाश संश्लेषण क्रियेत बाधा येते. परिणामी उत्पादनात घट होते.

तुडतुडे : प्रौढ व पिले हिरव्या रंगाचे, पाचरीच्या आकाराचे असतात. प्रौढ आणि पिले पानांच्या खालच्या बाजूला राहून पानांतील रस शोषतात. रस शोषतेवेळी तुडतुडे विषारी पदार्थ पानाच्या पेशीत सोडतात. अशी पाने सुरुवातीला तपकिरी रंगाची होऊन कालांतराने गळून पडतात. रोपांची वाढ खुंटते.

फुलकिडे : प्रौढ काळ्या रंगाचे आणि पिले पिवळसर तपकिरी रंगाची असतात. फुलोऱ्यामध्ये फुलकिड्यांचा प्रादुर्भाव दिसून येतो. प्रादुर्भाव जास्त झाल्यास फुलोरा गळतो. शेंगांची वाढ खुंटते. प्रादुर्भावग्रस्त शेंगांमधील दाणे लहान आणि आक्रसलेले दिसतात.

पांढरी माशी : पिले फिकट पिवळी रंगाची असतात. प्रौढ माशीला पांढुरके किंवा करड्या रंगाचे पंख असून, शरीरावर पिवळसर झाक असते. पिले व प्रौढ पानांतील रस शोषण करतात. शरीरातून सोडलेल्या चिकट गोड पदार्थावर काळ्या बुरशीची वाढ होते. त्यामुळे प्रकाश संश्लेषण क्रियेत बाधा





येते. मुगामध्ये येलो मोझॅक व्हायरस (वाय.एम.व्ही.) रोगाचा प्रसार पांढऱ्या माशीद्वारे होतो. त्यामुळे पाने पिवळी पडून वाळतात. उत्पादनात घट येते.

एकात्मिक व्यवस्थापन : माती परीक्षणावर आधारित खतमात्रेचा वापर, विशेषतः नत्र खतांचा संतुलित वापर करावा. वाढ संप्रेरकांचा अति वापर टाळावा, कारण त्यामुळे पिकाची अनावश्यक कायिक वाढ होऊन पिकात दाटी तयार होते. पांढरी माशी, तुडतुडे आणि मावा या किडींच्या व्यवस्थापनासाठी पिवळे सापळे, तर फुलकिड्यांच्या व्यवस्थापनासाठी निळे चिकट सापळे एकरी २० ते २५ या प्रमाणात वापरावेत.

५ टक्के निंबोळी अर्क किंवा अ‍ॅझाडिरॅक्टिन (१० हजार पीपीएम) ३ ते ५ मिलि प्रति लिटर या प्रमाणे फवारणी करावी.

पाने खाणाऱ्या अळ्या : पाने खाणारी स्पिंफजीड अळी : मादी, हिरवट पांढऱ्या रंगाची गोलाकार अंडी पानांच्या खालच्या बाजूस घालते. पूर्ण वाढ झालेली अळी फिकट हिरव्या रंगाची असून, त्यावर आठ पिवळे पट्टे असतात. अळ्या अधाशीपणे झाडांवरील सर्व पाने खातात.

हेलिकोव्हर्पा आर्मिजेरा : पूर्ण विकसित अळी पोपटी रंगाची असते. शरीराच्या बाजूवर तुटक करड्या रेषा आढळतात. अळी लहान असताना पानावर तर पीक फुलोऱ्यावर असताना कळ्या, फुले व शेंगांवर आक्रमण करते. अळी शेंगांवर अनियमित आकाराचे छिद्र पाडून अर्धी आत व अर्धी बाहेर राहून आतील विकसित होणारे दाणे खाते.

ठिपक्यांची शेंग अळी/शेंगा पोखरणारी अळी (मारुका स्पी.) : पतंग करड्या रंगाचा असून मागील पंखांवर पांढरे पट्टे आढळतात. मादी पतंग कळ्या, फुले व शेंगावर अंडी घालतात. अळी पांढऱ्या रंगाची असून अर्धपारदर्शक असते. तिच्या पाठीवर काळ्या रंगाच्या ठिपक्यांच्या जोड्या असतात.

नुकसानीचा प्रकार : मादी पतंग कळ्या, फुले व शेंगावर अंडी घालते. अंड्यातून निघालेली अळी कळ्या, फुले व शेंगांना जाळ्यांनी चिटकवून एकत्रित झुपके तयार करून त्यात राहते. ही अळी फुले, पाने, व शेंगा पोखरते. तिसऱ्या व चौथ्या अवस्थेतील अळी शेंगा पोखरून आतील दाणे खाते. अळी शेंगाच्या झुपक्यात किंवा मातीत कोषावस्थेत जाते. या किडीचा जीवनक्रम १८-३५ दिवसांत पूर्ण होतो.

आर्थिक नुकसानीची पातळी : जिथे उडीद, मूग ही पिके फुलोरा व शेंगा भरण्याच्या अवस्थेत आहेत, तिथे सर्वेक्षण करून नेमक्या किडीचा प्रादुर्भाव तपासावा. त्यासाठी शेतात २०-२५ ठिकाणी प्रति मीटर ओळीत पाहणी करावी. किडीचा प्रादुर्भाव सरासरी २-३ अळ्या प्रति मीटर ओळीच्या अंतरात दिसून आल्यास किडींनी आर्थिक नुकसानीची पातळी गाठली असे समजावे. त्वरित पीक संरक्षणाचे उपाय योजावे. एकात्मिक व्यवस्थापन हेलिकोव्हर्पाच्या सर्वेक्षणासाठी कामगंध सापळ्यांचा वापर करावा. त्यात हेलिल्युअर / हेक्झाल्युअर लावावे. त्यात सतत तीन दिवस प्रति कामगंध सापळा ८ ते १० नर पतंग आढळल्यास योग्य उपाययोजना कराव्यात. किडींवर उपजीविका करणारे मित्रकीटक शेतात आढळून आल्यास रासायनिक कीटकनाशकांचा वापर टाळावा. वेळेवर आंतरमशागत करून पीक तणविरहित ठेवावे. प्रादुर्भाव नुकताच सुरू झाल्यावर ५ टक्के निंबोळी अर्क किंवा अ‍ॅझाडिरॅक्टिन (१० हजार पीपीएम) ३ ते ५ मिलि प्रति लिटर या प्रमाणे फवारणी करावी. वरील सर्व उपायांच्या अंमलबजावणीनंतर किडीने आर्थिक नुकसानीची पातळी गाठल्यास केंद्रीय कीटकनाशक मंडळाद्वारे लेबर क्लेमप्राप्त पुढीलपैकी योग्य कीटकनाशकांचा वापर आलटून पालटून करावा. फवारणी प्रमाण प्रति १० लिटर पाणी (प्रमाण हाय व्हॉल्यूम पंपासाठी) क्लोरअ‍ॅन्ट्रानिलीप्रोल (१८.५ टक्के प्रवाही) २ मि.लि. किंवा थायोडीकार्ब (७५ डब्लू. पी.) १.५ ग्रॅम किंवा फ्लूबेंडायअमाइड (२० डब्ल्यू. जी.) ६ ग्रॅम किंवा नोव्हॅलूरॉन (५.२५ टक्के) अधिक इन्डोक्झाकार्ब (४.५० एस.सी.) (संयुक्त कीटकनाशक) १७ मि.लि. फ्लूबेंडायअमाइड (३९.३५ टक्के प्रवाही) २ मि.लि.




### महत्वाच्या घटना

१८४१ : जॉन हॅम्प्टन यांनी व्हेनेशियन शैलीच्या खिडकीचे पेटंट केले.
१८८८ : विल्यम बरोज याने बेरजा मारणार्या यंत्राचे पेटंट घेतले.
१९११ : पॅरिसच्या लुव्र या संग्रहालयातुन लिओनार्डो-द-व्हिन्सी याचे 'मोनालिसा' हे जगप्रसिद्ध चित्र चोरीला गेले.
१९१५ : पहिल्या महायुद्धा दरम्यान इटलीने तुर्की विरुद्ध युद्धाची घोषणा केली.
१९३८ : इटली देशांतील शाळांमध्ये ज्यू शिक्षकांवर बंदी घालण्यात आली.
१९६५ : रोमानियाने संविधान स्वीकारले.
१९७२ : वन्यजीव संरक्षण कायद्यास मान्यता मिळाली.
१९८८ : भारत आणि नेपाळ यांच्या सीमेवर आलेल्या तीव्र स्वरूपाच्या भूकंपामुळे हजारो लोक मृत्युमुखी पडले.
१९९१ : लाटव्हियाने स्वत:ला (सोविएत युनियनपासुन) स्वतंत्र घोषित केले.
१९९३ : मंगळाच्या शोधमोहिमेसाठी पाठवण्यात आलेल्या 'मार्स ऑब्झर्व्हर' या यानाचा पृथ्वीशी संपर्क तुटला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७६५ : विल्यम (चौथा) इंग्लंडचा राजा (मृत्यू: २० जून १८३७)
१७८९ : ऑगस्टिन कॉशी फ्रेन्च गणितज्ञ (मृत्यू: २३ मे १८५७)
१८७१ : गोपाळ कृष्ण देवधर भारत सेवक समाजाचे एक संस्थापक सदस्य, 'सेवासदन' या संस्थेचे शिल्पकार, सहकारी चळवळीचे आद्य समर्थक (मृत्यू: १७ नोव्हेंबर १९३५)
१९०५ : भारतीय अभिनेते आणि निर्माते बिपीन गुप्ता यांचा जन्म. (मृत्यू: ९ सप्टेंबर १९८१)
१९०७ : भारतीय वकील आणि राजकारणी पी. जीवनवंश यांचा जन्म. (मृत्यू: १८ जानेवारी १९६५)
१९०९ : नागोराव घन:श्याम तथा 'ना. घ.' देशपांडे कवी (मृत्यू: १० मे २०००)
१९१० : नारायण श्रीधर बेन्द्रे आदिम कलेपासून चिनी चित्रकलेपर्यंत अनेक शैलीविशेष आत्मसात केलेले चित्रकार (मृत्यू: १८ फेब्रुवारी १९९२)
१९१५ : राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय उर्दू भाषिक कादंबरीकार, लघुकथा लेखक, आणि चित्रपट निर्माता इस्मत चुग़ताई यांचा जन्मदिन.
१९२२ : अमेरिकन खजिनदार शोधक आणि मेल फिशर मरीन हेरिटेज म्युझियमचे संस्थापक मेल फिशर यांचा जन्मदिन.
१९२४ : श्रीपाद अच्युत दाभोळकर 'प्रयोग परिवार' या संकल्पनेचे प्रवर्तक, गणितज्ञ आणि जमनालाल बजाज पुरस्काराने गौरवण्यात आलेले कृषीशास्त्रज्ञ (मृत्यू: ३०एप्रिल २००१)
१९२७ : भारतीय स्वातंत्र्यसेनानी, समाजवादी राजकारणी आणि उत्तरप्रदेश, उडीसा आणि पश्चिम बंगाल राज्याचे माजी राज्यपाल बी. सत्य नारायण रेड्डी यांचा जन्मदिन.
१९३४ : सुधाकरराव नाईक प्रसिद्ध भारतीय राजकारणी, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे सदस्य तसचं, महाराष्ट्र राज्याचे माजी १३ वे मुख्यमंत्री (मृत्यू: १० मे २००१)
१९३९ : बोत्स्वानाचा राष्ट्राध्यक्ष फेस्टस मोगे यांचा जन्म.
१९६१ : व्ही. बी. चन्द्रशेखर भारताचा फिरकी गोलंदाज
१९७१ : प्रसिद्ध भारतीय राजकारणी आणि अरुणाचल प्रदेशचे विद्यमान मुख्यमंत्री पेमा खांडू यांचा जन्मदिन.
१९७३ : गूगल चे सहसंस्थापक सर्गेइ ब्रिन यांचा जन्म.
१९८१ : कनेक्ट्यू चे सहसंस्थापक कॅमेरॉन विंकल्वॉस यांचा जन्म.
१९८६ : उसेन बोल्ट जमैकाचा धावपटू. यांनी अनेक विश्व विक्रम आपल्या नावे केली आहेत.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९३१ : 'गायनाचार्य' पं. विष्णू दिगंबर पलुसकर संगीतज्ञ, गायक, संगीतप्रसारक आणि गांधर्व महाविद्यालयाचे संस्थापक (जन्म: १८ ऑगस्ट १८७२)
१९४० : लिऑन ट्रॉट्स्की रशियन क्रांतिकारक (जन्म: ७ नोव्हेंबर १८७९)
१९४७ : बुगाटी कंपनी चे संस्थापक इटोर बुगाटी यांचे निधन. (जन्म: १५ सप्टेंबर १८८१)
१९७६ : पांडुरंग सातू नाईक आल्हाददायकता, कल्पकता व वास्तवता ही वैशिष्ट्ये असलेले चित्रपट छायालेखक
१९७७ : प्रेमलीला ठाकरसी एस. एन. डी. टी. विद्यापीठाच्या कुलगुरू
१९८१ : आचार्य दत्तात्रय बाळकृष्ण तथा 'काकासाहेब' कालेलकर गांधीवादी देशभक्त, शिक्षणतज्ञ, समाजसुधारक, इतिहासकार, बहुभाषा कोविद, रसिक, सखोल चिंतक, गुजराथ विद्यापीठाचे कुलगुरू (१९२८), राज्यसभा सदस्य (१९५२ १९५८), अनुसूचित जमातींच्या आयोगाचे अध्यक्ष (१९५३), गुजराथी साहित्यपरिषदेच्या अहमदाबाद अधिवेशनाचे अध्यक्ष (१९५९), हिन्दी विश्वकोश निर्मिती समितीचे सदस्य, साहित्य अकादमी पारितोषिक (१९६६) व फेलोशिप (१९७१) विजेते, पत्रकार व गुजराथी साहित्यिक(जन्म: १ डिसेंबर १८८५ सातारा, महाराष्ट्र)
१९९१ : गोपीनाथ मोहंती ज्ञानपीठ पारितोषिक विजेते ओरिया साहित्यिक (जन्म: २० एप्रिल १९१४)
१९९५ : सुब्रमण्यन चंद्रशेखर तार्यांचे आयुर्मान व त्यांचा शेवट यावरील संशोधनासाठी १९८३ मधे नोबेल पारितोषिक मिळालेले भारतीय-अमेरिकन खगोल वैज्ञानिक व गणिती. त्यांनी आपल्या आयुष्यातील बराच काळ कृष्णविवरांवरील संशोधनासाठी खर्च केला. यांचे काका सी. व्ही. रामन यांनाही भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक (१९३०) मिळाले आहे. भौतिकशास्त्रात नोबेल मिळवणारे हे दोघेच भारतीय वंशाचे आहेत. त्यांनी आपल्या आयुष्यातील बराच काळ कृष्णविवरांवरील संशोधनासाठी खर्च केला. जन्म: १९ आक्टोबर १९१०)
२००० : निर्मला गांधी समाजसेविका, महात्मा गांधींच्या स्नुषा (जन्म:)
२००० : विनायकराव कुलकर्णी स्वातंत्र्यलढ्यातील व गोवा मुक्तीसंग्रामातील प्रमुख सेनानी आणि समाजवादी विचारवंत (जन्म:)
२००१ : मराठी रंगभूमीचा वारकरी म्हणून गौरविले गेलेले शं. ना. तथा दादासाहेब अंधृटकर (जन्म:)
२००१ : शरद तळवलकर आपल्या सदासतेज अभिनयाने मराठी रसिकांच्या मनावर प्रदीर्घकाळ प्रसन्नतेचे अधिराज्य गाजवणारे विनोदी कलाकार (जन्म: १ नोव्हेंबर १९२१)
२००४ : भारतीय उडिया भाषा कवी सच्चिदानंद राऊत यांचे निधन. (जन्म: १३ मे १९१६)
२००६ : बिस्मिला खाँ भारत रत्न, पद्मश्री व पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय शहनाई वादक (जन्म: १९१६)
२००७ : ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय उर्दू भाषिक लेखिका कुर्रतुलऐन हैदर यांचे निधन.

# रस्त्याच्या दुरूस्तीवर लाखो रुपये खर्च करुनही मुख्यरस्त्यावर खड्ड्याचे साम्राज्य

## वाहन चालकांची कसरत, मुख्याधिकारी याचे दुर्लक्ष, नागरीक त्रस्त





धारूर । प्रतिनिधी

शहरातील मुख्य रस्त्यावर मोठे खड्ड्याचे साम्राज्य झाले आहे. नगरपरीषदेने खड्डे बुजवण्याचे नावा खालीलाखोरुपये खर्च करण्यात आले आहेत मात्र हे खड्डे चुकवताना शहरातील मोठ्या वाहणाणा नाही तर दुचाकी स्वाराला अनेक समस्याला तोंड द्यावे लागत असल्यानेअधिकारी राज मुळे शहरवाशीय वैतागुण गैले आहेत नगरपरीषदेतील अधिकारशाही आल्याने जनता मात्र समस्यानी वैतागून गेले आहे नगरपरीषद प्रशासन या मुलभूत समस्या कडे लक्ष देईल का असा प्रश्न सर्वसामन्यातून केला जात आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चौक ते काशिनाथ चौक हा मुख्य बाजारपेठ तील वर्दळीचा रस्ता आहे रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्यामुळे नागरिकांना रस्त्यावरून नीट चालता येत नाही पावसाचे पाणी जमा झाल्याने रस्त्याला गटाराचे स्वरूप आले आहे तात्काळ हा रस्ता तात्तकाळ दुरुस्त करा.

**गणेश जाधव व्यापारी**

खराब झालेल्या रस्त्यावरील खड्डे भरण्यासाठी मुरूम वापरल्या मुळे पाऊस पडताच त्याचा चिखल तयार होतो वाहन धारक सह पाई चालणाऱ्या नागरिकांना पाण्यातून,दलदितून रस्ता शोधावा लागतो.नगर परिषद मुख्याधिकारी यांनी पाऊस पडल्यास शहरातून पायी फिरून दाखवावे.

**जनक फुन्ने नागरिक**

धारूर शहरात मुख्यरस्त्या वर खड्ड्याचे साम्राज्य झाले असून या खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणावर जमा होते हे खड्डे नगरपरिषदेने खड्डे बुजण्यासाठी मुरमाचा वापर केल्यामुळे मुरमाचे चिखलात रूपांतर झाले आहे त्यामुळे रस्ता सापडतच नाही.शाळेचे विद्यार्थी,महिला,नागरिक याची मोठी वर्दळ आणणाऱ्या रस्त्याचे गटार झाले आहे.नागरिकांना चिखल व दल दलितून रस्ता शोधावा लागतो.शहरातील मुख्य बाजारपेठ, हैद्राबाद बँक, सरस्वती विद्यालय व खाजगी रुग्णालयांकडे जाणारा रस्ता , संभाजी महाराज चौक बाजार तलाव रस्ता , पिलाजी मिल ते मच्छी मार्केट, लाकडी मशीन,कसबा विभाग धनगरवाडा सह शहरातील इतर भागात जाणाऱ्या रस्त्यांवर मोठ-मोठे खड्डे पडल्यामुळे होणाऱ्या घानी मुळे नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे या रस्त्याची कामे पावसाळ्यापूर्वी होणे आवश्यक होती परंतु नगरपरिषद प्रशासनाच्या दुर्लक्ष मुळे रस्त्याची कामे पूर्ण झाली नाहीत याचा त्रास शहरातील नागरिकांना सहन करावा लागत आहे.




# कोलकाता हत्या प्रकरण : माजलगाव येथे तीव्र पडसाद

## जिजामाता नर्सिंग कॉलेज अँड फिजिओथेरपी कॉलेजकडून घटनेचा निषेध

माजलगाव । प्रतिनिधी

कलकत्ता येथील आरजी कार मेडिकल कॉलेजमधील प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर झालेल्या क्रूर बलात्कार आणि हत्या प्रकरणानंतर देशभर हळहळ आणि संताप व्यक्त केला जात असून याच अनुषंगाने जिजामाता नर्सिंग कॉलेज अँड फिजिओथेरपी कॉलेज कडून कलकत्ता येथे झालेल्या महिला डॉक्टरच्या हत्येचा निषेध व्यक्त करून रॅली काढण्यात आली.

यावेळी जिजामाता नर्सिंग कॉलेज अँड फिजिओथेरपी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी शहरातील भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक ते छत्रपती संभाजी महाराज चौक पर्यंत रॅली काढण्यात आली तसेच कलकत्ता येथे आरजी कार मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलमध्ये दिनांक ९ ऑगस्ट २०२४ रोजी पहाटे सरकारी कर्तव्यावर रात्रपाळी करत असताना महिला डॉक्टरावरती अत्यंत अमानुष बलात्कार करून नंतर हत्या करण्यात आली जे इतरांच्या जीवनाचे रक्षण करतात त्यांच्या जीवाची रक्षण कोण करणार ? त्यांना न्याय कोण देणार ? अशा वेगवेगळ्या पोस्टरच्या माध्यमातून निषेध रॅली काढून या अमानुष घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. ही घटना समस्त माणुसकीला काळीमा फासणारी असून संबंधित गुन्ह्यातील सर्व आरोपीचा तातडीने शोध घेऊन त्यांना कठोर शिक्षा करावी अशा वेगवेगळ्या पोस्टरच्या माध्यमातून जिजामाता नर्सिंग कॉलेज अँड फिजिओथेरपी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी रॅलीच्या माध्यमातून निदर्शनास आणले या रॅलीसाठी जिजामाता नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य एन. विनोदकुमार,जिजामाता फिजिओथेरपी कॉलेजचे प्राचार्य करुणाकरण तसेच ऑफिस सुप्रीटेंडंट वाघ,इरफान पठाण आणि सर्व कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते

# आझाद क्रांती सेना विद्यार्थ्यांचा उघडा मोर्चा काढणार

माजलगाव । प्रतिनिधी

देशाला स्वतंत्र होऊ ७८ वर्ष झालेली आहेत आपण कालच १५ ऑगस्ट ला देशाचा ७८ वा स्वातंत्र्य दिन साजरा केला परंतु गोरगरीब वंचित समूहातील मुलांना जिल्हा परिषदे कडून ड्रेस, माय मोजे, व बूट दिले जातात परंतु यावर्षी जि प विद्यार्थ्यांना गणवेश, माय मोजे व बूट दिले गेले नाही याचे कारण काय लाडक्या बहिणींना पैसे दिले जातात परंतु लाडक्या बहिणीच्या पोरांना माजलगाव बीओ व जिल्हा परिषद बीड यांनी उघड ठेवण्याचं काम केल आहे त्यामुळे या रेड्याचं चामडं पांघरून प्रशासनामध्ये बसलेल्या लोकांना जाब विचारण्यासाठी वंचित समूहाच्या मुलांची थट्टा करणाऱ्या मानसिकतेतील अधिकाऱ्यांना प्रश्न विचारण्यासाठी आम्ही आझाद क्रांती सेनेच्या वतीने जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचा उघडा मोर्चा लवकरच काढणार आहोत आठ दिवसाच्या आत या विद्यार्थ्यांना जर गणवेश, पाय मोजे, व बुटांचे वाटप केले नाही तर मात्र आम्ही माजलगाव बी ओ कार्यालयावरती विद्यार्थ्यांचा उघडा मोर्चा काढणार आहोत याची खबरदारी संबंधित अधिकाऱ्यांनी घ्यावी.

# वसंतदादा पाटील महाविद्यालयात सद्भावना दिन



पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने २० ऑगस्ट रोजी सद्भावना दिन साजरा करण्यात आला.

प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रो. किशोर मचाले होते. त्यांच्या हस्ते दिवंगत पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमाल्यार्पण करण्यात आले. व्यासपीठावर उपप्राचार्य प्रो. सतिष माउलगे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य नामदेव चांगण, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. अशोक नागरगोजे, प्रा. मनिषा गाढवे, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. दिलीप गिऱ्हे, हिंदी विभागप्रमुख डॉ. न. पु. काळे, डॉ. हनुमान खेत्री, डॉ. शकुंतला बडे, प्रा. रुपेश कोकाटे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शरद पवार यांनी केले. आभारप्रदर्शन डॉ. नागरगोजे यांनी केले.

# सांची बुद्ध विहारात श्रावणी पौर्णिमा उत्साहात साजरी



माजलगाव । प्रतिनिधी

तथागत भगवान बुद्धांच्या जिवनात वर्षाच्या बारा पौर्णीमांना महत्व आसुन प्रत्येक पौर्णिमा बौद्ध बांधव विविध ठीकाणी उत्साहात साजरी करत आसतात याच प्रमाणे सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येथे भारतीय बौद्ध महासभा तालुका - शाखा माजलगांव च्या वतीने वर्षावासातील महत्वाची आसणारी श्रावण पोर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होते तर या कार्यक्रमा साठी प्रमुख मार्गदर्शक म्हणुण भारतीय बौद्ध महासभा जिल्हा संस्कार सचिव श्यामभाऊ वाघमारे हे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन वंचित बहुजन आघाडीचे जेष्ठ नेते अंकुश आण्णा जाधव ,माजी संरक्षण उपाध्यक्ष गुलाब प्रधान, बहुजन समाज पार्टी चे अभिमन्यु साळवे, हरिभाऊ साळवे, भारतीय बौद्ध महासभा शहर अध्यक्ष एल आर मस्के,महिला शहर अध्यक्षा वंदनाताई घनघाव, सेलापुरीचे उपसरपंच नाथाजी घडसे हे उपस्थित होते या कार्यक्रमात शामभाऊ वाघमारे यांनी श्रावण पौर्णीमेचे महत्व व पराभव सुत या विषयी मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे प्रस्ताविक भारतीय बौद्ध महासभा ता.संघटक पांडुरंग जाधव यांनी केले तर , आभार भारतीय बौद्ध महासभेचे संस्कार उपाध्यक्ष गुलाब धाईजे यांनी मानले तर सत्रसंचलन संस्थेचे ता सरचिटनीस सिद्धार्थ वक्ते यांनी केले वर्षावासत चालु असलेले डॉ बाबासाहेब आंबेडकर लिखित भगवान बुद्ध आणी त्यांचा धम्म या ग्रंथाचे वाचन संस्कार उपाध्यक्ष गुलाब धाईजे यांनी केले तर या कार्यक्रमा साठी भारतीय बौद्ध महासभेचे कोषाध्यक्ष डी एस दादा साळवे व सुभद्राबाई साळवे,यांनी भोजन दान दिले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चक्रधर पोटभरे ,डी पी पोटभरे आप्पा ,डी पी वाघमारे नाना,बाबासाहेब घनघाव,नितीन डोंगरे,राजभाऊ साळवे तात्यासाहेब साळवे ,भगवान डोंगरे,मोहनराव काकडे,बुद्धभुषण साळवे, लिलाताई उजगरे,पोटभरे ताई,मायाताई स्वामी,विशाखाताई वाघमारे ,मंदाताई साळवे ,शारदाताई तांगडे सिमा साळवे , प्रिती साळवे,कोमल साळवे,सह भारतीय बौद्ध महासभा तालुका पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले

# तरुणांना जर्मनीमध्ये रोजगाराची संधी

## महाराष्ट्र शासन व जर्मन सरकारचा संयुक्त उपक्रम

बीड । प्रतिनिधी

जर्मनीतील बाहन' बुडेनबर्ग हे राज्य व महाराष्ट्र शासन यांच्यामध्ये कुशल मनुष्यबळ पुरवठ्याया सामंजस्य करार झाला असून महाराष्ट्र शासन विविध क्षेत्रात जर्मनीतील राज्यांना विविध क्षेत्रातील कुशल मनुष्यबळ पुरवणार आहे. यामध्ये एकूण मुख्य चार क्षेत्रामध्ये रोजगाराच्या सुसंधी तरुणांना उपलब्ध झालेल्या आहेत. यामध्ये १. प्रोफेशन इन हेल्थकेअर :- यामध्ये । नर्स आणि नर्सिंग असिस्टंट, २. पंपाला तंत्रज्ञ. ३. रेडिओलॉजी असिस्टंट, ४. डेंटल असिस्टंट, ५. ज्येष्ठ नागरिकांसाठी काळजीवाहक, फिजिओथेरपिस्ट, ७. थर्ड पार्टी व्यवस्थापक ८. लेखापाल व प्रशासक इत्यादी संधी आहेत. २. कोशल्य क्षेत्रातील संधी :या क्षेत्रामध्ये। इलेक्ट्रिशियन, २. ऊर्जा विशेषज्ञ, ३. फिटिंग टेक्निशियन, ४. कारपेंटर, ५. ब्रेक तंत्रज्ञ ६. प्लंबर कार मेकॅनिक इत्यादी संधी या क्षेत्रात आहेत. ३. प्रोफेशन इन हॉस्पिटोल्यालिटी

या क्षेत्रामध्ये । रिशपनिष्ट, २. कुक, ३. हॉटेल मॅनेजर, ४. लेखापाल, ५. हाउसकोपिंग, ७. स्वच्छता इत्यादो संधी या क्षेत्रात आहेत. ४. संमिश्र क्षेत्र :- या क्षेत्रामध्ये १. ड्रायवार, २. सिक्यूरिटी गार्ड ३. डिलिव्हरी (पोस्टल सर्विसेस), ४. पॅकर्स अँड मुव्हर्स, ५. सपॉर्ट एअरपोर्ट. ६. हाउसकोपिग. ७. सेल्फ असिस्टंट, ८. वेअर हाऊस असिस्टंट इत्यादी रोजगाराच्या संधी या क्षेत्रामध्ये आहेत. या बारा क्षेत्रामध्ये विविध रोजगाराच्या सुसंधी असुन यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने जर्मन भाषेचे प्रशिक्षण बीड जिल्ह्यात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई यांच्यामार्फत देण्यात येणार आहे. यासाठी इच्छुकांना लिंकच्या माध्यमातून अर्ज करता येईल. यासाठी कोणतीही फी आकारली जाणार नाही व सदर मनुष्यबळ थेट महाराष्ट्र शासनाच्या वतीने दिले जाणार असल्याने कोणत्याही फसवणुकीचा धोका यामध्ये नाही. परंतु कुशल मनुष्यबळाला जर्मन भाषा शिकविण्यासाठी यांच्याकडून ठराविक कालावधीमध्ये घेतली जाणारी -१. -२. -१ व १८-२ या चार स्तर निहाय परीक्षा क्रमाने उत्तीर्ण होणे अपेक्षित आहे. यासाठी जर्मन भाषा अध्ययन केंद्रे बोड शहरात ३ व अंबाजोगाई शहरात २ अशी एकूण ५ केंद्र बीड जिल्ह्यात स्थापन करण्यात आलेली आहेत. सर्व इच्छुकांनी या संधीचा लाभ घ्यावा अशी आवाहन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या वतीने प्राचार्य डॉ.इब्राहिम नदाफ व डॉ.विक्रम सारूक यांनी दिली आहे.

# ॲड.नरसिंह जाधव यांचा मतदार संघात दौरा



बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील सर्वात मोठा आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघात युती आणि आघाडी मध्ये बऱ्याचश्या इच्छुक उमेदवारांची धावपळ चालू असताना दिसत आहे. यामध्ये पाटोदा तालुक्याचे भूमिपुत्र उच्च न्यायालय औरंगाबाद वकील संघाचे मा. अध्यक्ष ॲड.नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांची रा.काँ.पा.शरद पवार पक्षाकडून उमेदवारीची जोरदार चर्चा सुरू असताना त्यांनी गावभेट दौऱ्या सुरवात केलेली दिसत आहेत.

नुकताच त्यांनी येवलवाडी,पारनेर, कुटेवाडी, शिखरवाडी, धनगरजवळका, तांबाराजुरी, उंबरविहिरा, गरमाथा, डोंगरकिन्ही, जाधववाडी,करेगाव, रोहतवाडी, डोंबरी,नायगाव, पिठी, बेलेवाडी, पाटोदा, दासखेड, पाचेगाव, पाचांग्री ता. पाटोदा कडा गट, धानोरा ता.आष्टी मतदारसंघातील गावकऱ्यांशी विविध प्रश्नावर चर्चा करत असताना, निवडणुकी संदर्भात जनतेची मते जाणून घेतली जनतेतूनही उत्सपूर्त प्रतिसाद दिसत असल्याचे त्यांनी सांगितले ते पक्षाचे लिगल सेल चे प्रदेश उपाध्यक्ष म्हणून काम पाहत असून त्यांचं पक्षासाठी असलेले योगदान तसेच लिगल सेल माध्यमातून त्यांच्या मतदार संघातच संपूर्ण महाराष्ट्रात गाजलेल्या अनेक जनहितार्थ याचिका आहेत. ते मराठवाड्यात पक्षाची कायद्याची बक्कम सांभाळत आलेले आहेत. २०२३ मध्ये ते उच्च न्यायालयाचे अध्यक्ष असताना २०० वकिलांची टीम मनोज जरांगे पाटलांना यांच्या आरक्षणाला पाठिंबा घेऊन गेले होते. नुकत्याच पाटोदा शहरात झालेल्या पक्षाच्या शिवस्वराज्य यात्रेत त्यांनी चांगलेच भाषण गाजवले होते.

# वक्फ जमिनी सरकार पुढारी व भु-माफियांच्या घशात घालणार -खुर्शीद आलम




बीड । प्रतिनिधी

जिल्हाधिकारी मार्फत सन.मा.राष्ट्रपती, राज्य व केंद्र मंत्र्या ,अल्पसंख्यांक मंत्रालय, बोर्डअध्यक्ष, मा.मु.का.अ.औरंगाबाद, बीड(प्रतिनिधी) गेल्या आठवड्यात भारत सरकारने वक्फ जमीन ॲक्ट बदलण्याच्या निर्णय घेतला आहे या निर्णयाचे विरोधात आज मुस्लिम शिष्टमंडळाने माजी सभापती खुर्शीद आलम यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी मार्फत सन्माननीय राष्ट्रपतीजी, मा.अल्पसंख्याक मंत्री राज्य आणि केंद्र सरकार दिल्ली, अल्पसंख्याक मंत्रालय महाराष्ट्र सरकार मुंबई,मा.खासदार साहेब जिल्हा बीड, मा.जिल्हाधिकारी साहेब बीड, मा.अध्यक्ष व वक्फ मंडळ महाराष्ट्र राज्य, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र वक्फ बोर्ड मंडळ औरंगाबाद वगैरे यांना निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे की वक्फ बोर्ड म्हणजे इनामी जमिनीवर नियंत्रण मंडळ आहे, इनामी म्हणजे एका व्यक्तीकडे हजारो एकर जमिनी असून त्याला कोणीच वारस नाही तो व्यक्ती वयाच्या अंतिम टप्प्यात आपली सर्व मालमत्ता धार्मिक स्थळांना कायम दान करतो असेच अनेक लोकांनी आपल्या जमीनी विविध धर्मस्थळेला दिलेल्या आहेत, अनेकांनी धार्मिक श्रद्धा पोटी धार्मिक कामासाठी जमिनी दिलेल्या असून यामध्ये हिंदू लोकांनीही दर्गा-मस्जिद- कब्रस्तान वगैरे धार्मिक स्थळेसाठी हजारो एकर जमिनी दिलेल्या आहेत आणि त्याचे देखरेखीसाठी कायदेशीरपणे वाक्य बोर्डाची स्थापना केली गेली होती पण नवीन कायद्यामुळे वक्फ बोर्डाचे स्वातंत्र्य संपुष्टात येणार आहेत, वक्फ बोर्डाचे अधिकार स्थानिकच्या जिल्हाधिकारींना देण्यात आले आहेत, बोर्डाचे अधिकार जिल्हाधिकारींना गेल्यामुळे हजारो एकर जमिनी राजकीय दबावा खाली पुढाऱ्यांचे आणि मोठमोठ्या भु-माफियांच्या घशात जाणार आहेत त्यामुळे दर्गा-मज्जिद-कब्रस्तान वगैरेची व मुस्लिम समाजाचे ना भरून येणारे मोठे नुकसान होईल म्हणून नवीन कायदा रद्द करण्यात यावे नसता मुस्लिम समाजाच्या वतीने ठिकठिकाणी रस्ता रोको आंदोलन करू असा इशारा बीड नगर परिषदचे माजी सभापती तथा तहरीक-ए-अवकाफचे बीड जिल्हाध्यक्ष खुर्शीद आलम यांनी निवेदनद्वारे दिला आहे, निवेदनात म्हटले आहे की गेल्या आठवड्यात भारत सरकारने भारतीय संविधानाच्या ॲक्ट १४-१५-२५ चे उल्लंघन करून ॲक्ट १९९५ चे कायद्यामध्ये मनमानी बदल करून वर्ग दोनची वक्फ मालमत्ता वर्ग एक मध्ये घेण्याच्या कायदा लागू करण्याचा षडयंत्र सरकारने रचलेले आहे, या नवीन कायद्यामुळे देशातील हजारो हेक्टर इनामी जमिनी बेकायदेशीरपणे राजकीय पुढार्या व भु-माफियांच्या घशात घालण्याचे षडयंत्र आहे म्हणून २०२४ च्या कायदा रद्द करण्यात यावे अशी विनंतीपूर्वक मागणी खुर्शीद आलम यांनी केली आहे, मागणी मान्य झाले नाही तर या नवीन कायद्याच्या विरोधात सर्व भारतीय मुस्लिम समाज रस्त्यावर उतरून लोकशाही मार्गाने आंदोलन करेल असा इशाराही माजी सभापती खुर्शीद आलम यांच्या सह उपस्थित सर्व मान्यवरांनी दिला आहे, यावेळी शिष्टमंडळात मा. उपनगराध्यक्ष नसीम इनामदार,नगरसेवक शेख सादेक,नगरसेवक फसीभाई,ॲड.अझहर साहेब,सौदागर साहेब,मामु नगरसेवक,रफिकअहमद, अखील इनामदार,नबील उजमा,जुबेर भाई,गुड्डो भाई,राजू भाई,कलीम इनामदार,सय्यद मोसिन यांच्या सह आदी मान्यवर उपस्थित होते,


## जाहीर प्रगटन

**मा. श्री. एम. आय. एस. दर्यावर्दी, ७ वे दिवाणी न्यायाधीश क, स्तर, बीड, ता. जि. बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ११८२/२०२४**
**ॲड. आर. आर. शिंदे यांचे मार्फत**
**सोजरबाई व इतर वि. निरंक**

ज्याअर्थी, महादेव रखमाजी भावले, हे दिनांक १३/०६/२०२४ रोजी शिवकमल हॉस्पीटल बीड, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहे, आणि तसेच अर्जदार १. सोजरबाई भ्र. महादेव भावले, वय-८० वर्षे, धंदा-घरकाम, रा. धनगरवाडी, ता. जि. बीड, २ अशोक पि. महादेव भावले, वय-५९ वर्षे, धंदा-शेती, रा. खामगांव, ता. जि. बीड, ३ केरबा पिं. महादेव भावले, वय ४९ वर्षे, धंदा-शेती, रा. राजाराम पाटील नगर, खराडी,चंदननगर, पुणे., ४ बंडु पि. महादेव भावले, वय ३७ वर्षे, धंदा शेती रा, धनगरवाडी, ता. जि. बीड, ५ शहादेव पि. महादेव भावले, वय ५५ वर्षे, धंदा शेती, रा. खामगांव, ता. जि. बीड, ६ लंकाबाई भ्र. सुदाम चोरमले, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. कान्हापुरी, ता. जि. बीड, अर्जदार क्र. १ ही मयत यांची पत्नी असुन अर्जदार क्रमांक २ ते ५ हे मयताची मुले तर अर्जदार क्रमांक ५ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा /अर्जदाराचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहु मयत नामे महादेव रखमाजी भावले, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख २४/०९/२०२४ ही आहे. आज दिनांक १७ ऑगस्ट २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले

स्वाक्षरित
**कनिष्ठ लिपिक**

शिक्का

आदेशावरुन
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व स्तर, बीड.

# धाकट्या पवारांची थोरल्या पवारांना घेरण्यासाठी रणनीती

## राष्ट्रवादी अजित पवार गट -एमआयएम-वंचित बहुजन आघाडी विधानसभा एकत्र लढणार?

**बीड । प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीचे वारे सुरू झाले असून सर्वच पक्षांनी आपापल्या परीने तयारी सुरू केली आहे. सध्या सत्तेत असलेले राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या राष्ट्रवादी गटाने थोरल्या पवारांच्या राष्ट्रवादी गटाला घेरण्याची रणनीती आखली जात असून अजित दादा पवार गट, एम.आय.एम. आणि वंचित बहुजन आघाडीशी आघाडी करून एकत्र निवडणूक लढण्याची रणनिती आखत आहेत .या संदर्भात दोन्ही पक्षाच्या नेत्यांशी चर्चा करण्यात आली असून यासंदर्भात लवकरच निर्णय होण्याची शक्यता अधिकृत सूत्रांनी वर्तवली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा थोरले पवार म्हणजेच शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाला संपूर्णपणे घेरण्यासाठी अजित दादा पवार यांच्या गटाने तयारी सुरू केली असून आगामी विधानसभा निवडणुकीत आपल्या सोबत कोणा कोणाला घेता येईल याची



चर्चा सध्या सुरू आहे. एम. आय. एम. आणि वंचित बहुजन आघाडीला सोबत घेतले तर अजित दादा गटाला चांगले यश मिळू शकते अशी सध्या रणनीती सुरू आहे .या संदर्भात दोन्ही पक्षाच्या नेत्यांशी बोलणी सुरू असून ही आघाडी जर एकत्र आली तर थोरल्या पवारांना निवडणूक जड जाईल असे जाणकाराचे मत आहे .इकडे शरदचंद्र पवार यांना अजित दादा आणि मित्र पक्षांनी घेरायचे तर दुसरीकडे उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे आणि भाजपाचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी धोबीपछाड देण्यासाठी रणनिती तयार करायची अशी एकंदर चर्चा नेत्यांमध्ये चालू आहे .जर शिवसेना शिंदे गट, भाजपा आणि अजितदादा गट एकत्र लढले तर अजित दादांना पाहिजे तेवढे यश मिळणार नाही आणि यात भाजप आणि सेनेची ही नुकसान होईल. अशा परिस्थितीत अजित दादांना स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याची तयारी करायला लावून त्यांच्यासोबत एम.आय.एम. आणि वंचित बहुजन आघाडी अशी मित्र पक्षाची आघाडी करून त्यांनी एकत्र निवडणूक लढवायची अशी अशी रणनीती सध्या आखली जात आहे. या रणनीतीमुळे अजितदादा गट आणि मित्र पक्षांना बऱ्यापैकी जागा मिळतील अशी शक्यता जाणकार वर्तवत आहेत .मात्र ही आघाडी होईल की नाही याबाबत शंका असली तरी त्या दृष्टीने जोरात प्रयत्न चालू आहेत. सध्या चर्चेत असलेली मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना महाराष्ट्रामध्ये परिणामकारक ठरत असून या योजनेमुळे महिला वर्गामध्ये सरकार बद्दलचे मत सकारात्मक झाल्याचे दिसून येत आहे. ही योजना सरकारला कितपत तारेल हे निवडणुकीनंतरच कळणार आहे .मात्र सध्या तरी सरकारच्या बाजूने वातावरण तयार होताना दिसत आहे. या योजनेसाठी हजारो कोटींची तरतूद करावी लागणार आहे .यासाठी मार्चपर्यंत तरतूद करण्यात आल्याचे सरकारकडून सांगण्यात येत आहे. मात्र आगामी काळात मध्य प्रदेशात यशस्वी झालेली ही योजना संपूर्ण देशामध्ये लागू करण्याचा केंद्र सरकारचा विचार असून त्यासाठी केंद्र सरकारकडूनच निधी दिला जाईल अशी ही शक्यता वर्तवली जात आहे .सरकारकडून विविध योजना वंचित घटकासाठी राबवल्या जात आहेत .त्यात या नव्या योजनेची भर पडली असून प्रति महिन्याला महिलांना दीड हजार रुपये देऊन सरकारने निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सरकार बद्दल सकारात्मकता तयार केली आहे .या सर्व योजना शिवाय राजकारणामध्ये धोबीपछाड हा प्रकार सर्रास चालतो. त्यासाठी ही आणखी एक नवीन रणनीती आखली जात असून ही कितपत यशस्वी होईल हे निवडणुकीनंतरच कळेल .सध्या तरी थोरल्या पवारांना घेरण्याची पूर्ण तयारी सुरू झाल्याचे दिसून येत आहे.

### अजितदादा कर्जत- जामखेडमधून लढणार

**नगर जिल्ह्यातील कर्जत जामखेड मतदार संघातून उपमुख्यमंत्री अजितदादा पवार निवडणूक लढवण्याची शक्यता वर्तवली जात असून असे झाले तर या ठिकाणी पवार विरुद्ध पवार असा सामना रंगणार असल्याचे चित्र दिसत आहे. सध्या या मतदारसंघाचे विद्यमान आमदार रोहित पवार हे अजित दादांचे पुतणे आहेत .ते थोरल्या पवारांच्या गटाचे आमदार आहेत. बारामती मधून मात्र अजितदादा आपल्या मुलाला उभे करण्याची शक्यता वर्तवली जात आहे.**









# आ.लक्ष्मण आण्णा यांच्यामुळे मतदारसंघात रस्त्याचे जाळे निर्माण होत आहेत- शिवराज पवार

## २ कोटी १७ लक्ष रुपयांच्या सिमेंट रस्ता कांमाचा शिवराज पवारांच्या हस्ते शुभारंभ संपन्न

गेवराई । प्रतिनिधी

मतदारसंघातील गाव तिथे रस्ता करण्यासाठी आ.लक्ष्मण आण्णा पवार यांनी प्रमाणिक प्रयत्न करत आजपर्यंत विधानसभा मतदारसंघात रस्त्याचे जाळे निर्माण होऊन दळणवळणांचा मार्ग सुकर झाला आसल्याचे शिवराज पवार यांनी उद्घाटन प्रसंगी बोलताना सांगितले ते म्हणालेकी आण्णा आमदार होण्या आगोदर मतदारसंघाची अत्यंत दैयनीय आवस्था होती त्यामुळेच गेवराई मतदारसंघातील जनतेने परिवर्तन घडवून आण्णांना दोन वेळेस निवडुन दिले आहे जनतेने दाखवलेला विश्वास सार्थ करण्यासाठी आ.लक्ष्मण आण्णांनी जनतेशी प्रमाणिक प्रयत्न करत आसल्यांचे युवानेते शिवराज पवार यानी यावेळेस म्हटले आहे



विधानसभा मतदारसंघाचे आ.लक्ष्मन आण्णा पवार यांच्या प्रयत्नातून ह्याब्रियट ऑन्युईटी योजनेंतर्गत गेवराई जातेगाव रोडवर मोढा नाका ते १३२ पर्यंत १ कि.मी. सिमेंट रस्ता कामांचा शिवराज पवार यांच्या शुभारंभ संपन्न झाला

आ. लक्ष्मण आण्णा पवार यानी प्रयत्न करत जातेगाव रोडवर मोढा नाका ते १३२ केव्ही पर्यंत १ कि.मी. सिमेंट रस्त्यासाठी २ कोटी १७लक्ष रुपये निधीला मंजुरी मिळवून आज दि.२० ऑगस्ट रोजी सकाळी ११:०० वाजता युवानेते शिवराज पवार यांच्या हास्ते शुभारंभ करण्यात आले. यावेळी अभियंता घुळवे, बोद्रे राहुल खंडागळे, याहीया खॉन, दादासाहेब गिरी,भरत गायकवाड,आप्पासाहेब कानगुडे, अमन सुतार, महादेव बेद्रे,सचिन वावरे,बद्दोदिन,श्रिहारी गंगाधर, लक्ष्मण चव्हाण, प्रल्हाद येळापुरे,करण सुतार, मुन्ना मोटे, रजित डरफे, आब्दुलभाई, श्रीराम घाटुळ, कृष्णा पाटोळे, समाधान मस्के,राजु शेख,मतिन केरेशी,बाबुभाई फिटर,शेख उस्मान, सादेक चाचु,शेख बाबा,शेख मुददशीर, शेख नसिर, बाबासाहेब सावंत, सोमनाथ कानगुडे,मुन्नाभाई, शेख हाशम,विकास पवार, अमर मिसाळ, राजा पठाण, दिपक शेलार,नितीन शेट्टे,आदी उपस्थित होते

गेवराई शहरातील मोढा नाका येथुन जातेगावरोड वर मोढा नाका ते १३२ केव्ही पर्यंत १ कि.मी. लांबी ते १० मिटर रुंदीचा दर्जेदार सिमेंट रस्ता होणार आहे त्यामुळे परिसरातील नागरिकात समाधान व्यक्त होत आहे.

# पंकजाताई सोबत राहून गद्दारी करणाऱ्यांना येणाऱ्या विधानसभेत धडा शिकवू -ॲड.सर्जेराव तांदळे

**बीड । प्रतीनिधी**

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये बीड लोकसभा महायुतीच्या उमेदवार लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांना विजयी करण्यासाठी महायुतीचे जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी हे तन-मन-धनाने अहोरात्र मेहनत घेत होते. पंकजाताई मुंडे यांचा अगदी अल्पशामताने निसटता पराभव झाला. पंकजाताई यांचा हा पराभव त्यांचा वैयक्तिक नसून हा पराभव संपूर्ण बीड जिल्हा वासीयांचा आहे कारण पंकजाताई ह्या निवडून आल्यानंतर केंद्रामध्ये कॅबिनेट मंत्री नक्कीच होणार होत्या आणि त्या अनुषंगाने बीड जिल्हा भूतो न भविष्यती असा विकसित होणार होता. कारण पंकजाताई या राज्याच्या ग्रामविकास मंत्री असताना त्यांनी बीड जिल्हा सुजलाम सुफलाम बनण्यासाठी खूप मेहनत घेतली हे संपूर्ण बीड जिल्हातील जनतेने पाहिले आहे.पंकजाताई मुंडे यांच्या





पराभवा मागे त्यांच्यासोबत राहणाऱ्या काही खंडोजी खोपडेच्या अवलादिनी गद्दारी आणि फितुरी केल्यामुळे पंकजाताई यांचा निसटता पराभव झाला. ह्या खंडोजी खोपडे च्या अवलादी मध्ये काही स्वकीय पण आहेत आणि बाहेरील पण आहेत त्यामुळे येणाऱ्या विधानसभेत गद्दारांना आणि फितुरांना जनता त्यांची जागा दाखवील असे ॲड. तांदळे यांनी म्हटले आहे. सोबत राहून पाठीत खंजीर खुपसणाऱ्या नेत्यांना येणाऱ्या विधानसभेत चांगला धडा शिकवायचा आहे त्यांच्या या फितूरी व गद्दारीमुळेच पंकजाताईंचा पराभव झाला आहे आणि आता ते स्वतःला विधानसभेमध्ये आमदार बनण्यासाठी स्वप्ने पाहत आहेत. इतिहास साक्ष आहे गद्दारी आणि फितुरी करणाऱ्यांना माफी नाही.जैसी करनी वैसी भरणी या मनी प्रमाणेच येणारी विधानसभा निवडणूक पार पडणार आहे. जनता जनार्दनाच्या आशिर्वादाशिवाय कोणीही मोठा होत नसतो. या फितुरांची आणि गद्दरांची चाल बीड जिल्ह्यातील जनतेने ओळखली आहे. त्यामुळे येणाऱ्या विधानसभेत सर्व गद्दारांना आणि फितुरांना पाडल्याशिवाय बीड जिल्ह्यातील जनता स्वस्त बसणार नाही असे रोखठोक मत ॲड.सर्जेराव तात्या तांदळे भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा जिल्हा सरचिटणीस बीड यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे

# ना.समीर काझी यांच्या नागरी सत्कार सोहळ्याचे अंबाजोगाईत आयोजन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या अध्यक्षपदी (राज्यमंत्री दर्जा) तसेच महाराष्ट्र राज्य हज कमिटीच्या सदस्यपदी ना.समीर गुलामनबी काझी यांची निवड झाल्याबद्दल त्यांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी अंबाजोगाईत नागरी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा सोहळा दि. २१ ऑगस्ट बुधवार रोजी सायंकाळी सात वाजता शहरातील आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात संपन्न होणार आहे. समीर काझी यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ आणि हज कमिटीच्या कार्यात निश्चितच नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. त्यांच्या निवडीमुळे वक्फ मंडळाच्या आणि हज कमिटीच्या कामकाजात अधिक पारदर्शकता आणि विकास होईल, असा विश्वास त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त होत आहे. या नागरी सत्कार सोहळ्यात कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून रो.ओमप्रकाश मोतीपवळे तर प्रमुख अतिथी म्हणून इंजि. प्रमोद खैरनार, हाजी नसीर अहमद खलिफा आणि मोहम्मद शफी गुलामनबी काझी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहून समीर काझी यांचा गौरव करणार



आहेत. रोटरी क्लब परिवार, क्रेडाई परिवार, बागवान बिरादरी पंच कमेटी आणि काझी सेवा संघ, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. समीर काझी यांच्या विविध क्षेत्रातील योगदानाबद्दल आणि त्यांच्या सामाजिक कार्याबद्दलही या सोहळ्यात चर्चा होणार असून त्यांच्या निवडीने बीड जिल्ह्याच्या जनतेमध्ये आनंदाची लाट उसळली आहे आणि त्यांच्या कार्यकाळात विविध उपक्रमांच्या माध्यमातून समाजाच्या विकासासाठी ते महत्त्वपूर्ण योगदान देतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. सर्व नागरिकांना या सत्कार सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सोहळ्यासाठीची सर्व तयारी पूर्ण झाली असून सर्वांनी या सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# आरक्षण विरोधी निर्णयाच्या विरोधात पुकारलेल्या भारत बंदला रिपाइंचा पाठिंबा -जोगदंड

**बीड । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशातील अनुसूचित जाती, जमाती प्रवर्गातील समूहांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी भारतीय संविधानाच्या माध्यमातून आरक्षण मिळवून दिले. परंतु अनुसूचित जाती, जमातीच्या प्रवर्गातील समूहाचे आरक्षण संपविण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने पंधरा दिवसापूर्वी दिलेला आहे. या निर्णयाच्या विरोधात पुकारलेल्या भारत बंदला रिपाइंचा जाहीर पाठिंबा आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अनुसूचित जाती जमातीच्या समूहांना दिलेले



आरक्षण संपविण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय अन्यायकारक असून या निर्णयापुढे अनुसूचित जाती, जमातीचे आरक्षण संपुष्टात येणार ◀◀ पान ३ वर

# शेतकरी बांधवांनी परळी वैजनाथ राज्यस्तरीय कृषी महोत्सवास भेट देण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

बदलत्या परिस्थितीत शेतक-यांना उत्पादन वाढीसाठी प्रोत्साहन देण्यास अनन्यसाधारण महत्व आहे.प्रयोगशील व प्रगतीशील शेतक-यांचे माध्यमातुन शेतक-यांना आपआपसातील विचारांची देवाणघेवाण करण्यास व्यासपीठ उपलब्ध करुन दिल्यास त्यांच्यातील आत्मविश्वास वृध्दींगत होऊ शकतो. आधुनिक कृषि तंत्रज्ञानाचा शाश्वत पध्दतीने अवलंब केल्यास शेतकरी आर्थिक दृष्ट्टया उन्नत होऊन जागतिक पातळीवरील स्पर्धाक्षम वातावरणात आपले स्थान सिध्द करु शकतील. याकरीता धनंजय मुंडे, मंत्री कृषी, महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतून व प्रमुख मार्गदर्शनाखाली दि. २१ ते २५ ऑगस्ट २०२४ या कालावधीतपरळी वैजनाथ येथे राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या कार्यक्रमाचे उद्धाटनप्रसंगी एकनाथ शिंदे (मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य), शिवराजसिंह चौहान (मंत्री, कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार),देवेंद्र फडणवीस (उपमुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य) अजित पवार (उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य), धनंजय मुंडे (मंत्री, कृषी, महाराष्ट्र राज्य तथा, पालकमंत्री बीड जिल्हा), संजय बनसोडे, ( मंत्री, क्रीडा व युवक कल्याण बंदरे,महाराष्ट्र राज्य) यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

याशिवाय इतर संसद सदस्य, विधान परिषद सदस्य, विधानसभा सदस्य महोदय व विविध विभागाचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. राज्यातील शेतकऱ्यांची शाश्वत प्रगती व्हावी, कृषि विषयक विकसीत तंत्रज्ञान शेतक-यांपर्यंत पोहोचावे, शासकीय योजनांची माहिती शेतक-यापर्यंत पोहोचावी, शेतकरी ते ग्राहक थेट विक्री शृंखला विकसीत व्हावी व शेतमालाला चांगला बाजार भाव मिळावा तसेच शेतकरी व वरिष्ठ कृषी शास्त्रज्ञ यांच्यामध्ये थेट संवाद व्हावा म्हणून या प्रदर्शनात ४०० पेक्षा जास्त दालने ◀◀ पान ३ वर

# कै.दादाराव कराड विद्यालयात कोळी नृत्य स्पर्धा



अंबाजोगाई । प्रतिनिधी

माईर एम आय टी पुणे संचलित कै. दादाराव कराड विद्यालयात सोमवारी रक्षाबंधन व नारळी पौर्णिमा यानिमित्ताने कोळी नृत्य स्पर्धा संपन्न झाली.

अध्यक्षस्थानी प्राचार्य रामराजे कराड होते तर प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र टॅलेंट सर्च ओलंपियाड स्पर्धा परीक्षेचे राज्य प्रकल्प समन्वयक संतोष राऊत, पालक प्रतिनिधी श्रीनिवास घुगे, रामप्रसाद डापकर आदी उपस्थित होते.याप्रसंगी सदननिहाय कोळी नृत्य स्पर्धा घेण्यात आली. सुरूवातीला प्रतिमापूजन व अध्यक्ष, प्रमुख पाहुणे,पालक प्रतिनिधी,शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना रक्षाबंधन करण्यात आले.शेवटपर्यंत विद्यार्थ्यांच्या कोळी नृत्याने कार्यक्रमाची रंगत वाढवली. यावेळी विद्यार्थी,पालक उपस्थित होते.

### नारळी पोर्णिमे-निमित्ताने आयोजन

# आरक्षण लढ्यात संघर्ष करत राहू

## पदयात्रा : मयुरीताई खेडकर-मस्के यांचा निर्धार

**बीड । प्रतिनिधी**

ओबीसी आरक्षण बचावासाठी प्रा.लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे लढा देत आहेत.त्यांच्या या आरक्षण लढ्यात आम्ही शेवटपर्यंत संघर्ष करत राहणार आहोत, असा निर्धार मयुरीताई बाळासाहेब खेडकर मस्के यांनी व्यक्त केला.

बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यात येत असलेल्या बागपिंपळगाव येथून दि.१७ ऑगस्टपासून ओबीसी, दलित, अल्पसंख्याक आरक्षण बचाओ पदयात्रा काढण्यात आलेली आहे. सदरील यात्रा २५० किमीचा प्रवास करुन ३१ ऑगस्ट रोजी वडगाव ढोक येथे सपन्न होणार आहे. या आरक्षण लढ्याच्या पदयात्रेत आपण सहभागी आहोत.कोणत्याही कटकारस्थानाला आपण भीत नाहीत. कारण समाजाला न्याय आणि हक्क मिळवून देण्यासाठी ही पदयात्रा निघालेली असून हा आरक्षण बचाओ लढा यशस्वी होणार आहे. मयूरीताई खेडकर-मस्के पदयात्रा गावभेटीत असेही म्हणाल्या की, प्रस्थापित वर्गाने नेहमीच विस्थापित वर्गाला सामाजिक,राजकीय आर्थिक या बाबीपासून ◀◀ पान ३ वर



### या गावातून निघाली पदयात्रा

**ओबीसी, दलित, अल्पसंख्यांक आरक्षण बचाओसाठी गेवराई तालुक्यात पदयात्रा काढण्यात आली आहे.ही पदयात्रा गेवराई तालुक्यातील सर्व गावातून निघालेली आहे. त्यामुळे आरक्षण बचावासाठी समाजामध्ये एकी निर्माण होत असून नागरिक हक्क आणि न्याय मागण्यासाठी एक वज्रमूठ बांधत आहेत.**

# विद्यार्थिनींनी केले मूकबधीर व दिव्यांग विद्यार्थ्यांसोबत रक्षाबंधन साजरे



अंबाजोगाई प्रतिनिधी

शहरातील जिजाऊ विद्यालयाच्या विद्यार्थीनी अनोखे रक्षाबंधन साजरे केले शहरातील मानव विकास मूकबधिर विद्यालयातील विद्यार्थ्यांना राखी बांधून रक्षाबंधन साजरे केले.

रक्षाबंधन हा आपला संस्कृतीक व बहिण भावाचे नाते दृढ करणारा सण आहे तो सण प्रत्येक जण आपापल्या घरात मोठ्या आनंदाने साजरा करतो मात्र समाजातील उपेक्षित असणारे दिव्यांग आणि मूकबधिर विद्यार्थी यांच्यासोबत हा उत्सव साजरा केल्याने विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक सलोखा दृढ होण्यास मदत होते असे मत शाळेचे मुख्याध्यापिका श्रीमती मोहिनी जाधव यांनी व्यक्त केले. ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
बुधवार दि.२१ ऑगस्ट २०२४ । पान ७

# पूजा खेडकरच्या अडचणी वाढणार? तपासासाठी दिल्ली क्राईम ब्रांचचे पथक महाराष्ट्रात; पुण्यासह नगरमध्येही करणार चौकशी

**पुणे । प्रतिनिधी**

काही दिवसांपासून सातत्याने चर्चेत असलेली वादग्रस्त ट्रेनी आयएएस अधिकारी पूजा खेडकर प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. पूजा खेडकर प्रकरणाचा तपास करण्यासाठी दिल्ली पोलिसांचे पथक महाराष्ट्रात दाखल झालं आहे. सोमवारी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात आणि पूजा खेडकरच्या पुण्यातील घरी दिल्ली क्राईम ब्रांचने तपास केला आहे. त्यानंतर आज दिल्ली पोलीसांचं हे पथक अहमदनगर जिल्ह्यामध्ये तपास करणार आहे. खेडकर कुटुंबाचं मुळ गाव अहमदनगर जिल्ह्यातील भालगाव हे आहे. अहमदनगर जिल्हा रुग्णालयातून पूजा खेडकरला दिव्यांग प्रमाणपत्र देण्यात आले होते. त्यासंदर्भात देखील तपासाची शक्यता आहे.





पूजा खेडकरला दिल्ली उच्च न्यायालयाकडून २२ ऑगस्टपर्यंत अटकेपासून संरक्षण देण्यात आलेलं आहे. त्याआधी दिल्ली क्राईम ब्रांचला पूजा केडकर प्रकरणातील तपास करून यांची माहिती न्यायलयात देणं आवश्क आहे. त्या अनुषंगाने दिल्ली पोलिसांचे पथक सर्व तपास करत आहेत. २२ ऑगस्टपर्यंत केलेला तपास आणि अन्य माहिती दिल्ली पोलिस त्यांच्या सरकारी वकिलांच्या मार्फत कोर्टात मांडणार आहे, जेणकरून पूजा खेडकरला अटक करण्याची मागणी करता येईल. या पथकाने काल (सोमवारी) पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन तपास केला. त्यानंतर पूजा खेडकरच्या पुण्यातील घरी दिल्ली स केला. त्यानंतर आज दिल्ली पोलीसांचं हे पथक अहमदनगर जिल्ह्यामध्ये तपास करणार आहे. खेडकर कुटुंबाचं मुळ गाव अहमदनगर जिल्ह्यातील भालगाव हे आहे.

पूजा खेडकरला आपलं म्हणणं मांडण्यासाठी दिलेली मुदत संपली

पूजा खेडकरला डीओपीटीने मसुरी येथील प्रशिक्षण केंद्रात उपस्थित राहण्यासाठी दिलेली मुदत काल (शुक्रवारी) संपली आहे. त्यामुळे आता यापुढे पूजा खेडकरला तिची बाजू मांडण्याची संधी यूपीएससीकडून दिली जाणार नाही. तशी नोटीस काल (शुक्रवारी) संध्याकाळी पूजा खेडकरच्या (झेक्षर घहशवझरी) पुण्यातील बाणेर रस्त्यावर असलेल्या बंगल्याच्या गेटवर आणि अहमदनगर जिल्ह्यातील भालगाव इथल्या घराच्या दरवाज्यावर डीओपीटीकडून चिकटवण्यात आली होती.

# मंगलदास बांदल यांच्या निवासस्थानांवर ईडीचे छापे

**पुणे । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम सभापती मंगलदास बांदल यांच्या महंमदवाडी (पुणे )शिक्रापूर बुरुंजवाडी येथील निवासस्थानांवर( सक्त वसुली संचालनालय ) 'ईडी'ने छापेमारी केली आहे. मंगळवारी(दि. २०) सकाळी सात वाजता 'ईडी'च्या अधिकाऱ्यांनी एकाच वेळी या निवासनांवर छापे मारले. यापूर्वी मंगलदास बांदल यांच्या निवासस्थानावर आयकर विभागाने छापा टाकला होता. यावेळी प्रथमच 'ईडी'ने कारवाई केली आहे.



कारवाईच्यावेळी मंगलदास बांदल हे आपल्या मोहम्मद वाडी पुणे येथील निवासस्थानी होते. तर शिक्रापूर येथील निवासस्थानी त्यांच्या पत्नी माजी जिल्हा परिषद सदस्या रेखा बांदल तसेच बांदल यांचे भाऊ आहेत. 'मनी लॉन्ड्रींग' प्रकरणी 'ईडी'ने ही कारवाई केली असून कागदपत्रांची तपासणी केली जात आहे. बांदल यांच्याशी संबंधित बँकेची लाँकरही अधिकाऱ्यांनी तपासून पाहिले आहे.

बांदल हे शिवाजीराव भोसले सहकारी बँक प्रकरणातील आरोपी आहेत. बराच काळ ते तुरुंगात होते, सध्या जामिनावर बाहेर आहेत. त्यांनी लोकसभेसाठी वंचित बहुजन आघाडी कडून उमेदवारी घेतली होती,परंतु ती उमेदवारी नंतर वंचितनेच रद्द केली होती. शिरूर-हवेली विधानसभा लढविण्यासाठी सध्या ते इच्छुक आहे. बांदल हे 'ईडी'च्या चौकशीसाठी चार वेळा उपस्थित राहिले असून ते तपास कामी वेळोवेळी उपस्थित राहिले असल्याची माहिती त्यांचे वकील अँड. आदित्य सासवडे यांनी दिली आहे.

# शिवणकाम करणाऱ्या वडिलांची लेक बनली पोलिस

**मुळशी । प्रतिनिधी**

सुतारवाडी (ता. मुळशी) येथील मानसी संभाजी सावंत हिने पोलिस कॉन्स्टेबल पदाला गवसणी घातली आहे. कौटुंबिक परिस्थिती जेमतेम असलेल्या मानसीने जिद्दीच्या जोरावर खाकी वर्दीचे यश मिळविले. ड्रायव्हिंग आणि टेलरिंगचे काम करणाऱ्या वडिलांनी प्रपंचात काटकसर करीत लेकीला पोलिस बनविले. सावंत कुटुंबाच्या या यशाचे कासारअंबोली आणि आंबडवेट पंढरीत कौतुक केले जात आहे.



मानसीचे प्राथमिक शिक्षण सुतारवाडीच्या जिल्हा परिषद शाळेत, तर माध्यमिक शिक्षण पिरंगुट विद्यालयात झाले. मानसीचे वडील महिंद्रा कंपनीत ड्रायव्हर होते. याशिवाय नोकरीवरून आल्यानंतर रात्रीच्यावेळी कपडे शिवायची कामे करायचे. तर सातवीपर्यंत शिकलेल्या आई राणी घरातील व शेतातील कामे करायच्या.

मानसीला लहानपणापासून खाकी वर्दीचे आकर्षण होते. परंतु त्यासाठी लागणाऱ्या खर्चाचीही तिला चिंता होती. योगायोगाने बारामतीच्या शारदाबाई पवार भरतीपूर्व प्रशिक्षणाची तिने वर्तमानपत्रात जाहिरात वाचली. प्रशिक्षण पूर्णपणे मोफत असल्याने तिने बारामतीला जायचे ठरविले.भरतीपूर्व प्रशिक्षणासाठी लागणाऱ्या शारीरिक चाचणी परीक्षेत ती यशस्वी झाली व चार वर्षे पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण घेतले. पोलिस कॉन्स्टेबलसाठी लागणारी पात्रता पूर्ण करीत यश मिळविले. पदवीचे शिक्षण घेवून पोलिसांच्या वरिष्ठ पदाच्या परीक्षा देवून अधिकारी व्हायचा मानसीचा मानस आहे.

मानसीच्या या यशाबद्दल सुतारवाडी, कासारअंबोली ग्रामस्थांनी तिचा सत्कार केला. यावेळी सचिन अमराळे, यशवंत धनवे, शशिकांत सुतार, एकनाथ सुतार, सचिन धुमाळ, शशिकांत नागरे, राम गायकवाड, तानाजी सुतार, चंद्रकांत सुतार, राहुल सुतार, मंदार दिघे आदी उपस्थित होते. कासार आंबोलीतील श्रीमंत कासार पाटील मंडळाने तिच्या हस्ते स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजवंदन केले. त्यानंतर पोलिस पाटील स्वाती सुतार व माजी सरपंच सुवर्णा मारणे यांच्या हस्ते तिचा गौरव केला. यावेळी माजी सरपंच गणेश सुतार, माजी सरपंच राजेंद्र मारणे, विजय मारणे, प्रकाश मरळ, बापूराव पाटील, भानुदास मारणे, आडकर, प्रणय मारणे, भरत उभे, मरळ, पाटील आदी उपस्थित होते.

# पुण्यातील शाळेत विद्यार्थीनीवर अत्याचाराचा प्रयत्न?; स्वातंत्र्यदिनीच घडली घटना

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील भवानी पेठ भागातील एका नामांकीत शाळेत एका अल्पवयीन मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न झाल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. नुकताच बदलापूर इथं साडेतीन वर्षांच्या दोन चिमुकलींवर शाळेच्या सफाई कर्मचाऱ्याकडून अत्याचार करण्यात आल्याची घटना समोर आल्यानंतर नागरिकांनी रेल रोको केला आहे.

यापार्श्वभूमीवर पुण्यातल्या घटनेनं महाराष्ट्र पुन्हा एकदा हादरला आहे. विशेष म्हणजे देशाच्या स्वातंत्र्यदिनी अर्थात १५ ऑगस्टलाच ही घटना घडली आहे. याप्रकरणी समर्थ पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पुण्यातील भवानी पेठ भागातील नामांकीत शाळेत अल्पवयीन मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. पीडित मुलगी इयत्ता सातवीमध्ये शिकत आहे. आरोपी १९ वर्षांचा तरुण असून त्याच शाळेचा विद्यार्थी आहे. हा घडलेला प्रकार पीडित मुलीनं घरी गेल्यानंतर आईला ही घटना कथन केली. त्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. पोलिसांच्या माहितीनुसार, पुण्यातील भवानी पेठेत एक नामांकित शाळा आहे. स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी पीडित मुलगी शाळेत तिची स्कूल बॅग शोधण्यासाठी गेली होती. यावेळी आरोपी तरुण हा मुलांच्या स्वच्छतागृहाजवळ थांबला होता. पीडित मुलगी जवळ येताच आरोपीनं तिचा हात पकडत तिला जबरदस्तीनं स्वच्छतागृहात ओढत घेऊन गेला. यावेळी आरोपीनं तिच्या मनाला लज्जा उत्पन्न होईल असं कृत्य केलं. मात्र, पीडित अल्पवयीन मुलीनं आपली सुटका करून घेत पळ काढला. घरी गेल्यानंतर तिने आईला हा संपूर्ण प्रकार सांगितला. आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे. पोलीस उपायुक्त संभाजी कदम यांनी ही माहिती दिली.

# दिवसाढवळ्या घरफोडी ; सुमारे बत्तीस तोळयाचे दागिने केले लंपास

**नारायणगाव । प्रतिनिधी**

चोरट्यांनी सोमवारी (दि. १९) दुपारी दीड वाजता येथील नारायणगाव व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष अभय दयानंद पाटे यांच्या बंद बंगल्याच्या दरवाज्याचे कुलूप तोडून घरातील सुमारे बत्तीस तोळे सोन्याचे दागिने व एक लाख रुपयांची रोख रक्कम असा सुमारे दहा लाख रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध झाले असून त्यानुसार दोन तरुण चोरी करताना आढळून आले आहेत. अशी माहिती नारायणगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार यांनी दिली.



नारायणगाव व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष अभय पाटे यांचा येथील खोडद रस्त्यालगत बंगला आहे. नारायणगाव येथे त्यांचे किराणा मालाचे दुकान आहे. रक्षाबंधन सण असल्याने कुटुंबातील महिला बाहेरगावी गेल्या होत्या. तर घरातील पुरुष सदस्य सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास बंगल्याला कुलूप लावून किराणा मालाच्या दुकानात गेले होते. दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास दुचाकी वर आलेल्या दोन अज्ञात चोरट्यांनी बंगल्याच्या कंपाऊंड वरून उडी मारून आवारात प्रवेश केला. दरवाज्याचे कुलूप तोडून बंगल्यात प्रवेश केला. तसेच कपाटाचेही लॉकर तोडून सुमारे बत्तीस तोळे सोन्याचे दागिने व एक लाख रुपयांची रोख रक्कम घेऊन चोरटे पसार झाले.

# पुण्यात पावसाचा आणखी दोन दिवस मुक्काम; अलर्ट जारी

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहर परिसरात पुन्हा मुसळधार पाऊस बरसत आहे. गेली सलग तीन दिवस संध्याकाळच्या सुमारास मुसळधार पावसाची हजेरी लागली असून, पुढील दोन दिवस मुसळधार पाऊस असणार आहे, असा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. पुणे शहरातही पुढील दोन दिवस जोरदार पाऊस होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्कता बाळगावी असं आवाहन करण्यात आलं आहे.

राज्यात पाऊस पुन्हा सक्रिय झाल्याचं दिसून येत आहे, पुणे शहरासह ग्रामीण भागात देखील गेल्या तीन दिवसांपासून मुसळधार पाऊस धुमाकूळ घालतानाच चित्र आहे. पुणे शहर व जिल्ह्यामध्ये ढगांची निर्मिती होत असून, परिणामी जोरदार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.राज्याच्या अनेक भागात पाऊस कोसळत आहे. काही जिल्ह्यांमध्ये पुढील चार दिवस पावसाचा अंदाज आहे. हवामान विभागाने सोमवारी राज्यभरात काही ठिकाणी जोरदार पावसाचा यलो अलर्ट देण्यात आलेला होता, तर विदर्भ, मराठवाडा, खानदेश, मध्य महाराष्ट्र, कोकणातील सर्वच जिल्ह्यांना काही ठिकाणी जोरदार यलो अलर्ट जारी केला आहे.

# पिंपरी चिंचवड महापालिकेचा 'पर्यावरण सद्यस्थिती अहवाल' सादर

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरात उभारण्यात येणारे विकास प्रकल्प, (झउचउ)पायाभूत सुविधा व त्यांचे शहराच्या पर्यावरणावर होणारे परिणाम यांचे मुल्यांकन करणारा सन २०२३-२४ चा 'पर्यावरण सद्यस्थिती अहवाल' आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्याकडे आज झालेल्या विशेष बैठकीत सादर करण्यात आला.



महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीच्या दिवंगत माजी महापौर मधुकरराव पवळे सभागृहात झालेल्या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य अभियंता श्रीकांत सवणे, मुख्य लेखा परिक्षक प्रमोद भोसले, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी नीळकंठ पोमण, सह शहर अभियंता डॉ. ज्ञानदेव जुंधारे, संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे, संजय खाबडे, विजयकुमार काळे, बाबासाहेब गलबले, उपआयुक्त मनोज लोणकर, रविकिरण घोडके, अण्णा बोदडे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, कार्यकारी अभियंता हरविंदर सिंग बन्सल यांच्यासह क्षेत्रीय अधिकारी तसेच विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड शहरातील पाणीपुरवठा, जलनि:सारण, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, रस्ते, घनकचरा, हरितक्षेत्र, उद्यान विकास संवर्धन अशा अनेक सुविधा महापालिकेमार्फत पुरविल्या जातात. या सर्व सुविधांचे व्यवस्थापन करताना त्याचा शहराच्या पर्यावरणावर आणि नागरिकांच्या राहणीमानावर परिणाम होत असतो. त्या दृष्टीने पर्यावरण सद्यस्थिती अहवाल महत्वपूर्ण आहे.

# येरवडा मेट्रो स्टेशन बुधवारी होणार प्रवाशांच्या सेवेत दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे मेट्रो बुधवार (दि. २१) पासून येरवडा मेट्रो स्थानक प्रवासी सेवेत दाखल होत आहे. बुधवार पासून सकाळी सहा ते रात्री दहा या वेळेत प्रवासी सेवा सुरु राहणार आहे. उद्यापासून हे स्थानक प्रवासी सेवेत दाखल झाल्यामुळे, वनाझ ते रामवाडी पर्यंतचा संपूर्ण विभाग (मार्गिका २) पूर्णपणे कार्यान्वित होईल.

यामुळे येरवडा रहिवासी भाग उर्वरित मेट्रो नेटवर्कशी आणि पुणे शहराशी जोडला जाईल. यामुळे विद्यार्थी, व्यावसायिक, कर्मचारी वर्ग, येरवडा स्थानकाच्या जवळ असणाऱ्या आयटी हब मधील कर्मचारी आणि रहिवाशांच्या यांना फायदा होणार आहे. प्रवासी संख्या वाढवणे आणि पुण्याची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक मजबूत करणे यासाठी या स्थानकाच्या प्रवासी सेवेचा उपयोग होणार आहे. या स्थानकाची बाह्यरचना वैशिष्टपूर्ण आहे. स्थानकाचा दर्शनी भाग ऐतिहासिक दांडी मार्चपासून प्रेरित आहे, जो भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील महत्त्वपूर्ण अध्यायाचे प्रतीक आहे. हे स्थानक केवळ एक महत्त्वाचा वाहतूक दुवा म्हणून काम करणार (धशीरुरवर चर्शीी डीरींळेप) नाही तर आपल्या समृद्ध वारशाची आठवण करून देणारे आहे. महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर म्हणाले, पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना कार्यक्षम आणि सोयीस्कर सार्वजनिक वाहतूक उपलब्ध करून देण्याच्या आमच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणून येरवडा मेट्रो स्टेशन सुरू झाल्याची घोषणा करताना आम्हाला आनंद होत आहे

# तपास यंत्रणांची दिशाभूल करण्यासाठी आरोपींनी कट रचून बदलले रक्ताचे नमुने; आरोपींना २६ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे – कल्याणीनगरमधील अपघातानंतर अल्पवयीन मुलासोबत मोटारीत मद्याच्या अमलाखाली असलेल्या त्याच्या दोन मित्रांच्या रक्ताचे नमुने बदलल्याप्रकरणी आणखी दोघांना गुन्हे शाखेने अटक केली. अल्पवयीन कारचालकाच्या दोन्ही मित्रांनी मद्यप्राशन केले असतानाही त्यांच्या बचावासाठी तपास यंत्रणांची दिशाभूल करण्यासाठी अटक आरोपींनी विशाल अग्रवालसह ससूनमधील डॉक्टरांशी संगनमताने कट रचून रक्ताचे नमुने बदलल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. त्यासाठी त्यांनी कोणाच्या मध्यस्थीने रक्ताचा नमुना बदलला, तसेच कोणाला लाच दिली आहे का, याबाबत तपास करण्यात येत असल्याची माहिती पोलिसांनी मंगळवारी (ता. २०) न्यायालयास दिली.



आदित्य अविनाश सूद (वय ५२, रा. सोपान सोसायटी, बी. टी. कवडे रस्ता, घोरपडी) आणि आशिष सतीश मित्तल (वय ३७, रा. स्काय वेलवेडर सोसायटी, विमाननगर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. त्यांच्यासोबत रक्ताचे नमुने बदलण्यात सहभाग असलेल्या आणखी एका आरोपीचा पोलिस शोध घेत आहेत. तीनही आरोपींवर पुरावा नष्ट करणे आणि कट रचल्याच्या कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष न्यायाधीश यू. एम. मुधोळकर यांच्या न्यायालयात मंगळवारी या आरोपींना हजर करण्यात आले होते. अपघाताच्या घटनेनंतर 'पोर्शे' कारचालक अल्पवयीन मुलासोबत कारच्या मागील सीटवर असलेल्या दोन मित्रांनी मद्यपान केले होते. ते मद्याच्या अमलाखाली दिसत होते. परंतु, त्यांना वाचविण्यासाठी आरोपी आदित्य सूद आणि आशिष मित्तल याने ससूनच्या आपत्कालीन विभागाचा तत्कालीन मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीहरी हाळनोर याला लाच दिली, तसेच स्वत:च्या रक्ताचे नमुने देऊन ते या अल्पवयीन मुलांचे असल्याचे भासविण्यासाठी कट रचला. आरोपींना रक्ताचा नमुना बदलण्यासाठी कोणी सांगितले, त्यांनी कोणाच्या मध्यस्थीने व मदतीने हे कृत्य केले, त्यासाठी त्यांनी लाचेच्या स्वरूपात आणखी कोणाशी आर्थिक व्यवहार केला, रक्ताचे नमुने बदलताना ससूनच्या वॉर्ड क्रमांक चाळीसमध्ये आणखी कोण उपस्थित होते, अल्पवयीन मुलांच्या रक्ताचे मूळ नमुने त्यांनी नष्ट केले आहेत का, याबाबत तपास करायचा आहे, तसेच आरोपींचे मोबाईल जप्त करून त्याची तांत्रिक तपासणी करायची आहे. त्यासाठी आरोपींना पोलिस कोठडी देण्याची मागणी विशेष सरकारी वकील शिशिर हिरे आणि अतिरिक्त सरकारी वकील अनिल कुंभार यांनी केली. त्यावर न्यायालयाने या आरोपींना २६ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. सहायक पोलिस आयुक्त गणेश इंगळे या गुन्ह्याचा तपास करत आहेत.